RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

# शिव वाणी

■ बीड ■ साप्ताहिक ■ मराठी ■ वर्ष २२ वे ■ अंक ०३ ■ सोमवार दि.२० जानेवारी २०२५ Mo.9422748792/ 9822628521 ■ पाने : ४ किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) Weekly MARATHI Year-22 Issue -03 MONDAY DT.20 JANUARY 2025 RNI- MAHMAR2003/14666 PAGES - 4 PRICE - 3 RUPEES

## पालकमंत्री पद नाकारून विरोधकांचे दात घशात घातले

मंत्री धनंजय मुंडे यांनी मला बीड जिल्ह्याचे पालकत्व तर देऊच नये शिवाय कुठल्याही जिल्ह्याचे पालकमंत्री पद करण्यात येऊ नये अशी स्वतःहून विनंती पक्षप्रमुख महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली. त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आता तपास यंत्रणेवर कोणताही दबाव येणार नाही आणि विरोधकांनाही आता मंत्रिपदाचा राजीनामा द्या असे म्हणता येणार नाही. जर विरोधकांनी अजूनही मंत्रिपदाचा राजीनामा मागितला तर विरोधक रडीचा राजकीय डाव खेळत आहेत हे स्पष्ट होईल. त्यामुळे पालकमंत्री पद नाकारून धनंजय मुंडे यांनी विरोधकांचे दात घशात घातले आहेत.

# पालकमंत्रीपद नम्रपणे नाकारल्याने धनंजय मुंडे यांची राजकीय उंची वाढली !

## या राजकीय षडयंत्रात अभिमन्यू नव्हे तर अर्जुनच ठरणार धनंजय मुंडे ?

बीड / विशेष प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत असलेली सामाजिक आणि राजकीय परिस्थिती पाहता बीड जिल्ह्याचेच नव्हे तर कोणत्याही जिल्ह्याचे पालकत्व मला देण्यात येऊ नये अशी विनंती अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादीचे पक्षप्रमुख महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करून मनाचा दाखवलेला मोठेपणा त्यांची राजकीय उंची वाढवणारा



ठरला आहे. त्यांनी पालकमंत्री पद नाकारून विरोधकांना चांगलीच चपराक दिली आहे. त्यामुळे येणाऱ्या भविष्यकाळात धनंजय मुंडे यांना जरी विरोधकांनी अभिमन्यू करण्याचा प्रयत्न केला असला तरी देखील ते या चक्रव्यूहामध्ये अर्जुनच ठरतील यात शंका नाही.

बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्दयीपणे क्रूरतेने निर्घृण हत्या करण्यात आली.

(उर्वरीत पान २ वर)

### आता दादांची दादागिरी

दादांची राजकीय दादागिरी महाराष्ट्रात सर्वपरिचित आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये विरोधकांनी कितीही रान पेटवले, राजकीय दादागिरी करण्याचा प्रयत्न केला, तरी देखील महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा आपल्या परखड स्वभावाच्या दादागिरीने पक्षांतर्गत आणि विरोधी पक्षातील आवाज उठवणाऱ्या राजकीय विरोधकांना वठनीवर आणतील आणि हा अशांत झालेला जिल्हा शांत करतील.

### सामान्य जनतेच्या डोक्यात कधीच जातीवाद नाही

बीड जिल्ह्यामध्ये १८ पगड जाती जमातीचे लोक गुण्या गोविंदाने काल राहत होते, आज राहत आहेत आणि भविष्यातही राहतील. काही राजकीय नेते आपल्या राजकीय स्वार्थासाठी जातीयवादाचे बीज पेरत आहेत. पेरलेलं बीज काही प्रमाणात उगवेल मात्र त्याचा परिणाम सामाजिक सलोख्यावर होईल असे शक्य नाही. बीड जिल्ह्यातील जनता सुजान आणि संयमी आहे विरोधकांचा राजकीय डाव आणि स्वार्थ सामान्य जनतेच्या लक्षात आला तर ते त्या राजकारण्यांना वठनीवर आणण्यासाठी रस्त्यावर उतरतील यात शंका नाही.

## विश्व हॉस्पिटल बीडयेथे मणिपाल हॉस्पिटल पुणे यांची रुग्णसेवा

**न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांचे रुग्णांसाठी सेवा पर्व सुरूच**

**मेंदू,मनका व नस विकाराचे तपासणी शिबिर प्रचंड प्रतिसादात संपन्न**

प्रतिनिधी ।बीड

बीड जिल्ह्यातील एकमेव डेडिकेटेड असलेले सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर (मेंदू,मनका व नस विकार विशेषतज्ञ)यांच्या विश्व सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे सदैव होत असलेल्या विविध शिबिरापैकी यावेळेसही नववर्षाच्या पूर्वसंध्येला पुणे येथील सुप्रसिद्ध मणिपाल हॉस्पिटल येथील न्यूरोसर्जन डॉ अमित

(उर्वरीत पान २ वर)




## पालीच्या चांद तारा मस्जिद जवळ घाणीचे साम्राज्य ग्रामस्थ ग्रामपंचायत समोर ठिय्या आंदोलन करणार !

पाली / शेख आयेशा

बीड शहरापासून दहा ते बारा किलोमीटर सोलापूर मुख्य मार्गावर असलेल्या पाली येथील चांदतारा मज्जित जवळ नालीचे पाणी रस्त्यावर येत असल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी झाली आहे. या भागात आमदार फंडातून रस्ते करण्यात आले मात्र ग्रामपंचायतीने नाल्याच केल्या नाहीत. त्यामुळे नालीचे घाण पाणी थेट रस्त्यावर आणि रस्त्यावरून घरामध्ये, मज्जिदच्या जवळ जात असल्याने दुर्गंधी पसरली आहे. नमाजला पाक होऊन जाणेही अवघड झाले आहे. त्यामुळे या भागातील रहिवासी ग्रामपंचायत समोर रस्त्यावर आलेले नालीचे घाण पाणी बकेटीत घेऊन ग्रामपंचायत समोर टाकून ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

पाली ग्रामपंचायतचा आडमुठेपणा चांद तारा मस्जिद जवळ करण्यात आलेल्या रस्त्यांवरून दिसून येत आहे.





आमदार संदीप भैया क्षीरसागर यांच्या पुढाकारातून चांद तारा मज्जिद जवळील वस्त्यांसाठी चकाचक रस्ते करण्यात आले. मात्र रस्ते करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने आधी नाल्या करणे आवश्यक होते.पण ग्रामपंचायत ने नाल्याच केल्या नाहीत आणि रस्ते केले. त्यामुळे रस्त्यालगत असलेल्या घरातील बाथरूम त्याचबरोबर लॅट्रिनचे घाण पाणी थेट रस्त्यावर येत आहे. रस्त्यावरून हे घाण पाणी आता इतरांच्या घरात जात असून या

(उर्वरीत पान २ वर)

## घोडका राजुरीची दुर्दैवी घटना अत्यंत दुःखदायक- आ.संदीप क्षीरसागर

### मृत तरुणांच्या कुटुंबियांना १० लक्ष रूपयांची मदत जाहीर

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील पोलीस भरतीचा सराव करणार्या तीन तरूणांना एस.टी. बसने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्दैवी घटना अत्यंत दुःखदायक असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. तसेच सदरील तरूण हे सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील असल्याने शासनाकडून त्यांच्या कुटुंबीयांना मदत व्हावी अशी मागणीही घोडका राजुरी ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक व मतदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यानुसार मंत्री महोदयांनी प्रत्येकी १० लक्ष रूपये इतकी मदत कुटुंबियांना जाहीर केली आहे.



घोडका राजुरी येथील पोलीस भरतीची तयारी करणारे ५ तरूण नेहमी प्रमाणे रविवारी (दि.५) रोजी सकाळी सराव करत असताना अचानक एस.टी. महामंडळाची बीड येथून परभणीकडे निघालेल्या बसने व्यायाम करत असणार्या या तरुणांना चिरडले त्यापैकी २ तरूणांनी बचावात उडी मारल्याने ते जखमी झाले परंतु त्यातील ३ तरूण सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०), विराट बब्रूवान घोडके (वय १९), ओम सुग्रीव घोडके (वय २०) हे जागीच ठार झाले. पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणारे हे युवक अत्यंत सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील होते. त्यामुळे घोडा राजुरी येथील ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक यांनी मृतांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना या घटनेची माहिती देऊन या अपघातातील मृत झालेल्या तरूणांच्या कुटुंबियांना मदतीची मागणी केली होती. त्यानुसार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मृत्यू झालेल्या तीन्ही तरूणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लक्ष रूपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून मी या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी तर

(उर्वरीत पान २ वर)



बीड – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव स्वामी यांची निवड झाल्याबद्दल वडवणी तालुका शाखेच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देताना ज्येष्ठ मार्गदर्शक अँड विनायक जाधव यांच्यासह वडवणी नूतन तालुकाध्यक्ष अशोक निपटे,डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीश मुजमुले,पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती तालुकाध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे, उपाध्यक्ष शांतीनाथ जैन, सचिव अर्जुन मुंडे, कोषाध्यक्ष शंकर झाडे तर डिजिटल मिडियाचे उपाध्यक्ष शेख एजाज, सचिव अशोक फपाळ , कोषाध्यक्ष अंकुश गवळी,तसेच पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे उपाध्यक्ष द्यानेश्वर लंगे, सचिव गंगाभिष्म आंडील सर, कोषाध्यक्ष शंकर जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.



## पत्रकार संघाच्या वडवणी तालुकाध्यक्षपदी अशोक निपटे आणि मार्गदर्शकपदी अँड विनायक जाधव

**डिजिटल मीडिया तालुकाध्यक्षपदी सतीश मुजमुले तर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या तालुकाध्यक्षपदी प्रा. श्रीनिवास काकडे**

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या आदेशानुसार प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी वडवणी तालुका कार्यकारणी जाहीर केली. जेष्ठ मार्गदर्शक विनायक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारणी निश्चित करून जाहीर करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणी तालुका अध्यक्षपदी अशोकराव निपटे, उपाध्यक्षपदी शांतीनाथ जैन, सचिव पदी अर्जुन मुंडे, कोषाध्यक्ष पदि शंकर झाडे तर डिजिटल मिडिया संघ वडवणी तालुका अध्यक्ष पदी सतिषराव मुजमुले, उपाध्यक्षपदी शेख एजाज, सचिव पदि अशोक फपाळ , कोषाध्यक्ष पदी अंकुश गवळी,तर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या वडवणी तालुका अध्यक्ष पदी प्रा.श्रीनिवास काकडे, उपाध्यक्षपदी द्यानेश्वर लंगे, सचिव पदी गंगाभिष्म आंडील सर, कोषाध्यक्ष पदी शंकर जाधव इत्यादींच्या निवडी करण्यात आल्या. नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देवून सत्कार केला.

## भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनी सकाळी ९.१५ वाजता मुख्य शासकीय समारंभ

मुंबई : भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असे राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

मुंबई येथील मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल यांच्या हस्ते व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क दादर मुंबई येथे ध्वजारोहण व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल. विभागीय आणि जिल्हा स्तरावर पुढे

### जिल्हानिहाय ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची यादी जाहीर
### बीडचे मुख्य शासकीय ध्वजारोहण क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते

दर्शविल्याप्रमाणे मंत्री अथवा राज्यमंत्री ध्वजारोहण करतील.

ठाणे – उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, पुणे – उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार, नागपूर – मंत्री सर्वश्री चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अहिल्यानगर – राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील, वाशिम – हसन सकीना मियालाल मुश्रीफ, सांगली – चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील, नाशिक– गिरीश गीता दत्तात्रय महाजन,पालघर– गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक, जळगाव– गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील, यवतमाळ– संजय प्रमिला दुलीचंद राठोड, मुंबई शहर– मंगलप्रभात प्रेमकवर गुमनमल लोढा, मुंबई उपनगर– ड.आशिष मीनल बाबाजी शेलार, रत्नागिरी– उदय स्वरूपा रवींद्र सामंत, धुळे– जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, जालना– श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, नांदेड– अतुल लीलावती मोरेश्वर सावे, चंद्रपूर– अशोक जनाबाई रामाजी उईके, सातारा– शंभुराज विजया देवी शिवाजीराव देसाई, बीड– दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे, रायगड– आदिती वरदा सुनील तटकरे, लातूर– शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले, नंदुरबार– ङ माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे, सोलापूर– जयकुमार कमल भगवानराव गोरे, हिंगोली– नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ, भंडारा– संजय सुशीला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव– प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, बुलढाणा– मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील), सिंधुदुर्ग– नितेश नीलम नारायण राणे, अकोला– आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर, गोंदिया– बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील, कोल्हापूर– प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर, गडचिरोली– ड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल, वर्धा– पंकज कांचन राजेश भोयर, परभणी– श्रीमती मेघना दीपक साकोरे – बोर्डीकर अमरावती– इंद्रनील अनिता मनोहर नाईक.राष्ट्रध्वजारोहण करणारे मंत्री अथवा राज्यमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी तसेच इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी ध्वजारोहण करतील. संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजारोहण समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

शिव वाणी SHIV VANI



# संपादकीय

## राखावी बाबूंची अंतरे..

वाढत्या वेतनाची हमी असल्याने कोण कशाला करेल चोख काम! तरी बरे केंद्र सरकारमध्ये जवळपास १० लाख पदे अद्यापही रिक्त आहेत...

याआधीच्या वेतन आयोगांनी सरकारी तिजोरीवरला भार वाढवला वाढू द्या! त्यात आठव्या वेतन आयोगाची घोषणा तर दिल्लीतील आचारसंहिताकाळात झाली होऊ द्या!

जात, धर्म, राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम, विचारधारा वगैरे हवा तापवायला ठीक. पण हल्ली कोणतीही निवडणूक मतदारांना आर्थिक लाभ दिल्याशिवाय जिंकता येत नाही हे लोकसभा, त्यापाठोपाठ झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड विधानसभा निवडणुकांच्या निकालांवरून स्पष्ट झालेलेच आहे. तेव्हा दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर केंद्र सरकार जादूगाराप्रमाणे टोपीतून एखादा ससा काढणार ही अपेक्षा होतीच. ती फोल ठरली नाही. कारण केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची नरेंद्र मोदी सरकारची घोषणा. भले पंतप्रधानांनी कधी काळी रेवडी संस्कृतीची खिल्ली उडवली असेल. पण तो इतरांना द्यावयाच्या उपदेशाचा भाग झाला. लोकांना सांगायचे ब्रह्मज्ञान आपण थोडेच पाळायचे असते! त्यामुळे दिल्लीतले चार लाख सरकारी कर्मचारी एका झटक्यात या वेतन आयोग घोषणेने खूश होणार असतील तर ते योग्यच म्हणायचे. दिल्ली काबीज करायचीच या निर्धाराने उतरलेल्या भाजपने आठवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा करून दिल्लीतील सरकारी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची मते मिळतील, असा प्रयत्न केल्याचा आरोप होईल. होऊ द्या! वास्तविक प्रथेनुसार २०२६ साली नवा वेतन आयोग येणे अपेक्षित आहेच. पण दिल्ली विधानसभा निवडणुका २०२५ साली आहेत त्याला बिचारे केंद्र सरकार तरी काय करणार? खरे तर दिल्ली विधानसभा निवडणुका ऐन भरात आलेल्या असल्याने अशी घोषणा हा आचारसंहिता भंग असल्याची किरकिर आता काही करतील. करू द्यात! अशा किरकिऱ्यांच्या तक्रारींकडे कसे दुर्लक्ष करावे याचा पुरेसा सराव आयोगाला आहे. शेवटी आयोगही माणसांचा ना. त्यांनाही पोट असते, निवृत्तीनंतरच्या नेमणुका असतात. तेव्हा निवडणुकीत विजय सलामत तो आरोप पचास हे सत्य महत्त्वाचे. असो.

तर सरकारी कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचवावे तसेच त्यांची क्रयशक्ती वाढावी या दुहेरी उद्देशाने वेतन आयोगाच्या माध्यमातून सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत सुधारणा केली जाते. या आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा सुमारे ४९ लाख कर्मचारी तसेच ६५ लाख निवृत्तिवेतनधारक अशा एक कोटीपेक्षा अधिक आजी-माजी कर्मचाऱ्यांचा फायदा होईल. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नवीन वेतन आयोगाची घोषणा होताच लगोलग राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून वेतनात वाढ करण्याची मागणी पुढे येते. तशी ती आली. आणि मग राज्याराज्यांमधील सत्ताधाऱ्यांनाही नवा आयोग लागू करण्याशिवाय पर्याय नसतो. केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मोठी मतपेढी असल्याने कोणत्याही सत्ताधाऱ्यांना या वर्गाला नाराज करता येत नाही. भले मग वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करताना केंद्र आणि सर्वच राज्यांची तिजोरी आटली हे कितीही खरे का असेना! सध्या लागू असलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर केंद्र सरकारच्या खर्चात २०१६ नंतर वार्षिक एक लाख कोटींनी वाढ झाली. हा खर्च नंतर वाढतच गेला. आठव्या वेतन आयोगाचा भार यापेक्षाही अधिक असेल. पूर्वी १९९४ मध्ये लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपासून केंद्र व राज्यांचे आर्थिक कंबरडे पार मोडले. विशेषत: राज्ये आर्थिकदृष्ट्या अडचणीत आली आणि त्यातून अद्यापही बाहेर आलेली नाहीत.

# रॉयलस्टार संघ ठरला जयभवानी चषकांचा मानकरी

# शिवराज पवारांच्या हास्ते ट्रॉफी व बक्षीसांचे वाटप

## रॉयलस्टार संघ विजेता तर डि.डी.संघ ठरला उपविजेता

गेवराई ।प्रतिनिधी

नगरपालिकेचे मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यांचा १ जानेवारी रोजी वाढदिवस होता त्या निमित्त भगवती क्रिकेट क्लबच्या वतीने जयभवानी चषकांचे आयोजन करण्यात आले होते या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आज दि.१९ जानेवारी रोजी सकाळी०२:०० वाजता अंतिम सामना होऊन संघ ठरला चषकांचा मानकरी तर दुतिय बक्षीस या संघाला मिळाले आहे तर बक्षीस वितरण युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते देण्यात आले आहेयावेळी तालुकाप्रमुख शिनुभाऊ बेद्रे यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, विलास गुंजाळ, सालम चाऊस, विनायक गिरी,समाधान मस्के, पिटु साळवे.दिपक अवघड, शेख मुद्दशीर, शेख नसिर,रजित काबंळे,कृष्णा पाटोळे,बालाजी जाधव, वाजेद पठाण, शेख बाबा,राजेंद्र तातडीया, प्रदीप सुतार,आकाश सुतार, अशोक नांडे, आदी उपस्थित होते, स्पर्धेचे समालोचन आविनाश माळवदे, यांनी केले आहे तर पंच म्हणून सुधीर जाधव यांनी योगदान दिले आहे तर स्पर्धा यशस्वी करण्यासा



### भगवती क्रिकेट क्लबने परिश्रम घेतले

जयभवानी चषकाचे आयोजण जय भवानी चषकांमध्ये भगवती क्रिकेट संघ, आर.के.संघ, रॉयलस्टार संघ,माही संघ,विलास सुतार संघ,डि.डी.संघ, पोलीस बॉइज संघ,एकता कल्ब संघ, पेटंर संघ, ऋथ.संघ, झुंजार संघ,आधार संघ आदी संघाने सहभाग घेतला.

मनोज पाटोळे,दत्ता चव्हाण, रवि उफाड,डिगाबर गिरी, (कर्णधार ) सोनु राठोड, अनिकेत मस्के,बंटी राठोड, सुनिल पवार, शैलेश टाक,सोनु भारती,शंकर खैरे,धनंजय जाधव, आरेफ शेख,अमोल कानाडे,दिलीप धुरंधरे,सुमित भुत्ते,मुन्नासेठ चौधरी,योगेश चव्हाण, शंकर उबदे, आरबाज बागवान, इम्मु बडा,बाळु चव्हाण,आकाश पवार, आदीनी परिश्रम घेतले

# संविधान अमृत महोत्सवा निमित्त पुणे मंबई विभागीय कविसंमेलनाचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र व्दारा संविधान अमृत महोत्सवा निमित्त पुणे मुंबई विभागीय कविसंमेलनाचे दि.२४.०१.२०२५.रोजी दुपारी १२ ते सांय.४ वाजे पर्यत एस एम जोशी सभागृह, पत्रकार भवन शेजारी नवीपेठ,पुणे येथे आयोजन करण्यात आलेले आहे. कविसंमेलनाचे उद्धघाटक डॉ. दत्तात्रेय गायकवाड विचारवंत सुप्रसिद्ध साहित्यिक पुणे करणार आसुन प्रमुख पाहूणे लेखक कवी दिग्दर्शन ह्रदयमानव अशोक व जित्या जाली(जितेन सोनवणे) सुप्रसिद्ध कविवर्य उपस्थित राहाणार आहेत.उद्धघाटन सत्राच्या अध्यक्षस्थान धी.चंद्रप्रकाश जी. शिंदे (अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.)हे भुषवणार आहेत.सुत्र संचालन किरण प्रकाश जिलाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.पुणे,प्रस्तावित सुभाष गवळी (राज्य कर्यकारिणी सदस्य मा.प्र.सृ. सा. प.)करणार आहेत.



अंमत्रित कवी रवि कांबळे(पुणे),देविलाल रैराळे(अमरावती),सागर वाघमारे(मावळ पुणे),कवयित्री कविता काळे(हाडपसर पुणे),सुभाष वाघमारे (वालचंद नगर)कवियित्री पोर्णीमा कुंभारकर(सासवड),तानाजी शिंदे (उदगीर),शब्दश्वर मंगरुळकर(जुन्नर),जयद्रथ आखाडे(निगडी पुणे),विक्की कांबळे (पुणे),आम्रपाली पारवे (बीड),दत्तात्रेय भोसले(वालचंद नगर) आनंद चोपडे(बेळगांव),कवयित्री माधुरी वाघमारे( वाकड पुणे),कवियित्री आशाताई शिंदे (लातुर),विक्रम गांगुर्डे(नाशिक),कवयत्रि रेखा फाले(सिंहगड पुणे) आकाशभोरडे (शिरुर) सुनिल बोरसे(चाळीसगंव) लक्ष्मण शिंदे(भोर),बबन मोरे (हिंगोली),कवी पी.के (.पन्हाळा),हर्षानंद सोनवणे(खडकवासला),सुधीर भालेकर(बाणेर),गिरीश जाधव(हाडपसर),कवयित्री वृषाली रणधीर(पुणे),तुकाराम कांबळे(पुणे),अनिल सोनवणे(मुंबई)गजलकार साजन पीलाने (पुणे) इ.चा सहभाग राहाणार आसुन कविसंमेलन अध्यक्ष धी. सुनिल गायकवाड सचिव मा.प्र.सृ.सा.प.महा.राहाणार आसुन सुत्रसंचलन प्रा.डॉ. चंद्रकांत साळवे संघटक मा.प्र.सृ.सा.प.महा.राज्य तर आभार सुजीत कांबळे जिलाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.सांगली हे करतील तेव्हा साहित्यिकांनी व साहित्य रसिकांनी कविसंमेलनास उपस्थित राहावे आसे नम्र निवेदन प्र.सृ.सा.प.महा.राज्याचे उपाध्यक्ष भिमराव सरवदे,सहसचिव राजू वाघमारे,योगीराज कोचाडे,प्रा.डॉ.कोंडबा हाटकर,कोषाध्यक्ष प्रो. विठ्ठल जाधव इ.नी केले आहे



**बीड (प्रतिनिधी)**

**शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड झाली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सत्कार केला.बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्यावतीने अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले. त्यांचा प्रशासनातील दांडगा अनुभव व कणखरपणा बीड जिल्ह्याला प्रगतीपथावर घेवून जाण्यास नक्की मदत करेल, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# शिवमहापुराण कथा ऐकल्यानंतर प्रत्येक व्यक्तीला मन:शांती मिळते - ह.भ.प.मते महाराज

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी शहरातील राम मंदिर चौकात दिनांक १४ /१ /२०२५ वार मंगळवार यज्ञरोजीपासून भव्य शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे .या शिवमहापुराण कथेसाठी रोज हजारो भाविक भक्त कथेचा लाभ घेत आहेत. शिवमहापुराण कथा ऐकल्यानंतर प्रत्येक व्यक्तीला मन:शांती मिळते असे प्रतिपादन ह.भ.प.शालीग्राम मते महाराज यांनी आपल्या प्रबोधनातून केले.वडवणी शहारातील रामबाग चौकात शिवमहापुराण कथेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे.वडवणी शहारातील महिला मंडळाच्या माध्यमातून, संकल्पनेतून शिवमहापुराण कथा आयोजित करण्यात आली



आहे.अध्यात्माशी प्रत्येकाने नाते जोडावे.भगवंताचे नामस्मरण करावे.योग्य संस्कार जीवनाला दिशा देतात,असा उपदेश ही ह.भ.प.मते महाराजांनी दिला.शिव जन्माची कहाणी, तसेच शिवपुराणातील अनेक कथा त्यांनी उलगडून दाखवल्या.यावेळी .शिव महापुराण कथेसाठी गायणचार्य हे.भ.प.बप्पा महाराज कोठुळे,सिंध वादक ह.भ.प.माऊली महाराज, तबला वादक सखाराम महाराज उंबरे यांच्या संगीतने शिव पुराणाची कथा संगीतमय झाली आहे.या शिव महापुराणाची सांगता दिनांक २०/०१/२०२५ सोमवार रोजी सकाळी महाप्रसादांनी होईल तरी वडवणी शहरातील व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कथेचा व दिनांक २०/०१/२०२५ सोमवार रोजी सकाळी ११ वा.काल्याचे किर्तन ह.भ.प.शालीग्राम मते महाराज यांचे होईल

## पान१ वरून...

**पालकमंत्रीपद नम्रपणे ...**

या घटने दरम्यानच धनंजय मुंडे यांचे अतिशय निकटवर्तीय राष्ट्रवादीचे पदाधिकारी वाल्मीक अण्णा कराड यांच्यावर आवादा कंपनीला दोन कोटीची खंडणी मागितली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला. सरपंच देशमुख यांचा जो खून झाला त्याचे मूळ या आवादा कंपनीला मागितलेल्या खंडणीच्या प्रकरणात असल्यामुळे या खुणाच्या कटामागे वाल्मीक कराड यांचा थेट संबंध आहे. असा उघड आरोप सर्वप्रथम राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी रोखठोकपणे घेतला.यानंतर या प्रकरणाला भारतीय जनता पार्टीचे आष्टी विधानसभेचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी या प्रकरणात वाल्मीक कराड यांना दोषी असल्याचे ठरवत त्यांना राजकीय पाठबळ हे मंत्री धनंजय मुंडे यांचे असल्याचा थेट आरोप केला. इतकेच नाही तर या प्रकरणाशी काडीचाही संबंध नसलेल्या मंत्री पंकजा मुंडे यांचे देखील जाहीर पणे काढलेले वाभाडे सरकारला डोकेदुखी करणारे ठरले. एवढेच नव्हे तर राष्ट्रवादीतीलच माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनीदेखील आपल्याच पक्षातील कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात रोखठोक भूमिका घेतली. दरम्यान या प्रकरणांमध्ये हत्येच्या पाठोपाठ जातीय वाद उफाळून आला. मराठा आणि वंजारी असा थेट जातीयवाद प्रखरतेने वाढल्यामुळे सामाजिक सलोखा बिघडला. जातीय आणि राजकीय संघर्ष शिगेला पोहोचला. बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रातच नव्हे तर देशांमध्ये हा जिल्हा गुंडांचा जिल्हा आहे.या ठिकाणी राजरोस अवैध व्यवसाय गुंडागर्दी होते. सामान्य लोकांना जगणे अवघड आहे. अशी प्रतिमा उभा करून बीड जिल्ह्याचे नाव बदनाम करण्यात आले.या घटनेच्या अडून मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागण्यावर विरोधकांनी जंग जंग पछाडले. या विरोधकांच्या मदतीला मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे यांच्यासह अंजली दमानिया, तृप्ती देसाई यांच्या सारखे सुद्धा भरीस भर पडले. मागील दीड महिन्यापासून जनसामान्यांचे डोके भडकवण्याचे काम राजकीय विरोधकांनी केले. मात्र मंत्री धनंजय मुंडे यांनी अगदी शांत राहून या बिघडलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला.

संवेदनशील झालेल्या या परिस्थितीत धनंजय मुंडे यांचे राजकीय अस्तित्व संपवण्यासाठी विरोधकांनी राजकीय षडयंत्राचे जाळे विणले. मात्र आज पर्यंत धनंजय मुंडे हे विरोधकांच्या प्रत्येक आक्रमणाला प्रती विरोध न करता शांतपणे त्यांचे वार झेलत मैदानामध्ये कणखरपणे उभे आहेत. त्यांच्यातील राजकीय संयमता आणि प्रगल्भता लक्षात घेता ते या संकटावर मात करून ही लढाई जिंकतील आणि अभिमन्यू नव्हे तर अर्जुन ठरतील, यात शंका नाही. जेव्हा धनंजय मुंडे राजकीय विरोधकांना चारी मुंड्या चित्त करण्यासाठी आपली चाल चलतील त्यावेळी विरोधकांची पळता भुई झाल्याशिवाय राहणार नाही हे नाकारून चालणार नाही.

**विश्व हॉस्पिटल बीड...**

धाकोजी यांनी आज मेंदू ,मनका व नस विकाराच्या रुग्णांना सेवा देऊन शिबिरास प्रचंड प्रतिसादात संपन्न केले. शिबिरामध्ये २०० पेक्षा जास्त रुग्णांनी तपासणी करून

## पान१ वरून...

आणि उपचारासाठी योग्य ते मार्गदर्शन घेतले. सोबतच जिल्ह्यातील सुप्रसिद्ध असे विश्व हॉस्पिटल येथील न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांनीही रुग्णांची तपासणी करून रुग्णांच्या असलेल्या मेंदू, मनका व नस संदर्भातील संबंधित सर्व विकारा चे निरसन करण्यासाठी योग्य ते उपचाराने मार्गदर्शन केले.शिबिरामध्ये अनेक रुग्णांनी आपल्या दुर्धर आजारावर उपचार मार्गदर्शन घेतल्याने जिल्ह्यातील सामान्य रुग्णांच्या आजारांना कुठेतरी निरसन करण्याचे ठिकाण म्हणून विश्व हॉस्पिटल बीड यांच्याकडे पाहिले जात आहे. इथून पुढेही मेंदू,मनका व नस विकाराच्या रुग्णांच्या तपासणीसाठी असेच शिबिर विविध सुप्रसिद्ध डॉक्टरांच्या उपस्थित घेतले जातील असे विश्व हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांनी कळवले..! बीड सारख्या ठिकाणी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल च्या माध्यमातून मेंदू मनका वनसंदर्भातील पॅरालिसीस,हातापायाच्या मुंग्या, मेंदूतील गाठी, मणक्यातील गाठी, नसा संदर्भातील इतर दुर्धर विकारांसाठी विश्व हॉस्पिटल येथे सदैव सेवा सुरू आहे तसेच हॉस्पिटलमध्ये छउत,एएऋ, आणि फिजिओथेरपी विभागही कार्यरत आहे..!

शिबिराच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजू रुग्णांना माफक दरामध्ये फायदा व्हावा हाच प्रमुख उद्देश ठेवून. विश्व हॉस्पिटल सामान्य रुग्णांसाठी काम करत आहे असे विश्व हॉस्पिटलचे सर्वेसर्वा तथा सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर आणि विश्व हॉस्पिटलच्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ स्वप्नजा पिंगळकर यांनी कळवले

**पालीच्या चांद तारा....**

घाणीमुळे बाजूलाच असलेल्या मज्जिद मध्ये नमाज साठी पाक होवून जाणे देखील अवघड झाले आहे. या भागातील विद्यार्थ्यांना शाळेला जाताना नालीच्या घाण पाण्यातून जावे लागत असल्यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. एवढेच नव्हे तर या भागातील नागरिकांचे आरोग्य देखील या घाण पाण्यामुळे संकटात सापडले आहे. रोगराई होण्याची शक्यता असल्याने या भागातील ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. ग्रामपंचायतने याची दखल घेऊन तात्काळ नाली बांधकाम केले नाही तर या भागातील रहिवासी थेट ग्रामपंचायत समोर या घाण नालीतील पाणी बकेटीने घेऊन येऊन टाकतील आणि ग्रामपंचायतच्या ऑफिसमध्ये नाली बांधकाम सुरू करेपर्यंत ठिय्या आंदोलन करतील असा इशारा या भागातील शेख रफिक, शेख करीम, शेख शिकूर, शेख कलीम, शेख सत्तार, शेख लतीफ, शेख खाजा, शेख निजाम, शेख यासीन, शेख मंजूर, शेख रशीद, शेख शफिक, शेख लियाकत, शेख इरफान, शेख गफार आदींनी दिला आहे.

**घोडका राजुरीची ...**

आहेच परंतु या कुटुंबियांच्या घरातील सदस्य म्हणून मी यापुढे त्यांच्या सुखःदुखात कायम असेल. तसेच शासनाने जाहीर केलेली मदत कुटुंबियांना मिळेपर्यंत पाठपुरावा करणार आहे यासोबतच ग्रामस्थ व नातेवाईक यांच्या मागणीनुसार कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याबातही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.



# सह्याद्री मराठी पत्रकार संघाची केज तालुका कार्यकारिणी जाहीर

केज/प्रतिनिधी

दि.१८ जानेवारी रोजी सह्याद्री मराठी पत्रकार संघाची २०२५ वर्षासाठी ची केज तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात येऊन केज तालुका पदाधिकारी निवडीची प्रक्रिया शासकीय विश्रामगृह येथे पार पडली असुन सह्याद्री मराठी पत्रकार संघ केज तालुकाअध्यक्षपदी दैनिक सामना वृत्तपत्राचे पत्रकार व कराटे प्रशिक्षक श्री. अनिल ठोंबरे सचिवपदी डॉ.लतिफशेख,कार्याध्यक्ष पदी महादेव दौंड तर तालुका संघटकपदी काशीनाथ कातमांडे

यांची निवड संघाचे अध्यक्ष गोविंद नाना शिनगारे, संघाचे पदसिद्ध सचिव तथा प्रदेशाध्यक्ष डॉ. जावेद शेख,प्रदेश कार्याध्यक्ष शहाजीभोसले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सर्वानुमते निवड करण्यात आली असून सह्याद्री मराठी पत्रकार संघ हा मागील अनेक वर्षापासून सामाजिक, कृषी,औद्योगिक,ग्रामीण, शहरी भागातील सर्व सामान्य नागरिकांच्या विकासात्मक कार्यासाठी तसेच समाजहितासाठी कायम कटिबध्दराहिलेला आहे.संघाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य तसेच सामाजिक जनजागृती संघ अविरत करत असुन संघाने पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी सदैव आवाज उठलेला आहे तसेच पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचा निर्धार करत येणाऱ्या काळात केज तालुक्यात सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे काम तळागाळापर्यंत पोहोंचवण्यासाठी कार्य करणार असल्याचे नव निर्वाचित पदाधिकारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले व सर्व पदाधिकारी यांना निवडी नंतर पुढील वाटचाली साठी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच मित्र सहकारी यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या व सर्वांच्या सहकार्याने सह्याद्री मराठी पत्रकार संघाची केज तालुका कार्यकारिणी निवड संपन्न झाली.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत). का.संपादक : शेख आयेशा

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# केंद्रप्रमुख श्रीमंत गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्स्फूर्त प्रतिसादाने संपन्न

रोहिलागड ।प्रतिनिधी

माननीय शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद जालना यांच्या आदेशान्वये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मानसिक भाषिक विकासाबरोबरच शारीरिक विकास व सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून शाळास्तर ते जिल्हास्तरापर्यंत क्रीडा नैपुण्य प्राप्त व्हावे याकरिता नुकतेच निपुण केंद्र रोहिलागड तालुका अंबड जिल्हा जालना येथे दि.१६ ते १७ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा प्रशासनाच्या सर्व शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा येथील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केंद्रप्रमुख श्रीमंत गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ग पहिली ते पाचवी लहान गट व सहावी ते आठवी मोठा गट मुला मुलींसाठी सांघिक खेळ कबड्डी खो-खो व वैयक्तिक खेळ लांब उडी उंचउडी १०० मीटर व २०० मीटर धावणे व तसेच सांस्कृतिक स्पर्धा सह क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्स्फूर्त प्रतिसादाने संपन्न झाल्या



यामध्ये खालील विजय स्पर्धकांचे पुष्पगुच्छ प्रस्तुती पत्र देऊन केंद्रप्रमुखांच्या हस्ते सत्कार करण्यात आला वर्ग सहावी ते आठवी मोठ्या गटांमध्ये खोखो मुली विजयी संघ किनगाव वाडी रोहिलागड संयुक्त विजेता खो खो मुले विजयी संघ किनगाव वाडी कबड्डी मुले विजयी संघ किनगाव वाडी कबड्डी मुली विजयी संघ कौचलवाडी १०० मीटर धावणे मुले सार्थक पालवे देश गव्हान प्रथम क्रमांक प्रज्वल नागलोत कौचलवाडी द्वितीय क्रमांक १०० मीटर धावणे मुली स्वाती नागलोत कौचलवाडी प्रथम क्रमांक दिव्या देवरे देशगव्हाण द्वितीय क्रमांक २०० मीटर धावणे मुले प्रज्वल नागलोत कौचलवाडी प्रथम क्रमांक कुलदीप टकले रोहिलागड द्वितीय क्रमांक २०० मीटर धावणे मुली तेजल बहुरे निहालसिंगवाडी प्रथम क्रमांक संस्कृती पाटील रोहिलागड द्वितीय क्रमांक केंद्र स्तर क्रीडा स्पर्धा. इयत्ता १ ते ५ खो खो मुले प्रथम क्रमांक रोहीलागड खो खो मुली प्रथम क्रमांक रोहिलागड कबड्डी मुले प्रथम क्रमांक किनगाव वाडी कबड्डी मुली प्रथम क्रमांक रोहीलागड १०० मी धावणे प्रथम फैजान पठाण.रोहिलगड २००मि धावने प्रथम आर्यन कालुंके रोहिलागड १००मी धावणे योगिता टकले रोहीलगड २००मी धावणे भक्ती नगलोत किनगाव वाडी दिनांक १६ व १७ जानेवारी रोजी केंद्रप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली पी एम श्री शाळा रोहिलागड येथे झालेल्या केंद्रस्तरी क्रीडा स्पर्धेतील विजय स्पर्धकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व हार्दिक शुभेच्छा दिल्या क्रीडा स्पर्धा यशस्वीतेसाठी स्पर्धा संयोजक आश्रुबा गवळी श्री वाघ सर छानवाल सर तांगडे सर नामदेव गंगावणे सर श्रीमती जाधव श्रीमती गोरडे श्रीमती माळोदे श्रीमती गिरी श्रीमती रेखावार श्री अग्रेसर श्री कणके सर श्री छोले सर इत्यादींनी परिश्रम घेतले

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ चिंचोली येथे हरिनाम सप्ताह कीर्तन प्रवचनांचे आयोजन

घनसावंगी ।प्रतिनिधी

तालुक्यातील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील श्री मच्छिंद्रनांच्या मंदिरामध्ये धर्मनाथ बिज निमित्त दि२४ जानेवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा व श्रीमद भागवत कथा आयोजित केला आहे दि ३१ जानेवारी रोजी पर्यत सप्ताह होणार आहे.सप्ताहात नामवंत कीर्तनकारांची कीर्तने व प्रवचने होणार आहे मच्छिंद्रनाथ चिचोली येथील मच्छिंद्रनाथ मंदिरात श्री ह.भ प.समाजयोगी नवनाथ महाराज नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांच्या सप्ताहा कमिटीच्या सहकार्याने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते या सप्ताहामध्ये अखंड वीणावादन, पहाटे काकडा, आरती, सकाळी ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन, गाथा भजन, महिला भजन, प्रवचन, सायंकाळी हरिपाठ, संध्याकाळी हरिकीर्तन व हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत यात ह भ प भागवताचार्य जगन्नाथ महाराज सांगळे यांच्या अमृत वाणितुन संगीत भागवत कथा होणार आहे या सप्ताहात दि २४ रोजी ह.भ.प नंदकिशोर महाराज जाधव दि २५ रोजी ह भ



प साहेबराव महाराज धांडगे दि २६ रोजी ह भ प विनोदवैभव पांडुरंग महाराज उगले .दि २७ रोजी ह भ प शिवा महाराज बावस्कर दि २८ रोजी ह भ प संगीतताताई महाराज व्यवहारे दि २९ रोजी ह भ प गाथा अभ्यासक चांगदेव महाराज काकडे दि ३० रोजी ह भ प किर्तन केसरी अक्रूर महाराज साखरे. दि ३१ रोजी सकाळी श्री ह भ प ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांचे १० ते १२ काल्याचे किर्तन होईल नंतर महाप्रसादाने सांगता होईल श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ चिंचोली पंचक्रोशी तील भाविक भक्तांनी या लाभ घ्यावा आसे आयोजकांनी केले आहे.



बीड – दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव विवेक स्वामी यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या प्रदेश संपर्क प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देताना इंजिनिअर सय्यद अकबर, सामाजिक कार्यकर्ते अक्तर खान आणि अंबादास काळे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोससाठी रवाना

## महाराष्ट्राचा वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या गुंतवणूक परिषदेत सहभाग

मुंबई :- स्वित्झर्लंड मधील दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्यावतीने आयोजित गुंतवणूक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून रवाना झाले.दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने १९ ते २४ जानेवारी या कालावधीत ही परिषद आयोजित केली आहे. यापूर्वी श्री. फडणवीस त्यांच्या पहिल्या कार्यकाळात तीन वेळा दावोसमधील या परिषदेत सहभागी झाले होते. त्यानंतर मुंबईत दोन वेळा मॅग्नेटिक महाराष्ट्र या गुंतवणूक परिषदेचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वात आयोजन झाले होते. यामुळे महाराष्ट्र औद्योगिक गुंतवणुकीत पाचव्या स्थानावरुन महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला होता.

आताही या दावोस दौर्यात गुंतवणूकदारांना आकर्षित करता येईल यादृष्टीने भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यात मुख्यमंत्री श्री.फडणवीस अनेक जागतिक नेत्यांच्याही भेटी घेणार आहेत. या दौर्यात उद्योगमंत्री उदय सामंत, तसेच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको यांचे अधिकारी



शिष्टमंडळ सहभागी होणार आहे.

डेटा सेंटर्स, ऑटोमोबाईल्स, सेमिकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येने सामंजस्य करार या दौर्यात होणार आहेत. महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक राज्यात आणण्याचा प्रयत्न या दौर्यातून साध्य करण्याचा प्रयत्न होईल. अर्थात प्रामुख्याने यातून रोजगारनिर्मितीचेही उद्दिष्ट साध्य केले जाणार आहे.



बीड – प्रा. गणेश पोकळे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव स्वामी यांची निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मुंबई येथे विश्ववशांती बुद्ध विहार समिती नियोजित मानूरच्या वतीने कुटुंब मेळावा संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

दि.१२/१/२०२५ जे.के.कॉलेज सेंटर वडाळा मुंबई न.६२ येथे विश्र्वशांती बुध्द विहार समिती (नियोजित ) मानूर जि.बीड यांचे वतीने कुटुंब मेळावा आयोजित करण्यांत आला.मुंबई पुणे इ.ठिकाणी वास्तव्यास असलेली मानूर गांवची पंडागळे,जाधव,उबाळे,वाघमारे,इ.भावकीतील मंडळीनी आपला परिचय करुन दिला.तसेच सदर कुटुंबातील उच्चशिक्षीतांचा योग्य असा यथोचित सन्मान करण्यांत आला.या प्रसंगी मानूरचे लोकनियुक्त सरपंच मा.श्री अशोक (मामा)



पाखरे,ग्रा.प.मानूर ता. शिरुर (कासार) जि.बीड. मा.आ.रामभाऊ पंडागळे,मा.श्री संजू ढाकणे मेजर,ग्रा.पं सदस्य, आयु.आनंद जाधव समिती सचिव,आयु.भाऊसाहेब पंडागळे,

समिती अध्यक्ष मा.देवानंद उबाळे,समिती कोषाध्यक्ष मा.बबन पंडागळे,समिती कार्याध्यक्ष आयु.रमेश जाधव,समिती उपाध्यक्ष डॉ.पंकज पंडागळे,डॉ.गौरव पंडागळे, सिध्दार्थ जाधव,भगवानराव पंडागळे व इ.मेळाव्यांस कुटुंबासह उपस्थित राहुन भोजनाचा आस्वाद घेवून कार्यकमाची सांगता यशस्वी पणे झाली.

# महिलांनी सौंदर्य प्रसाधनांवरील पिंक टॅक्ससाठी उठाव करण्याची गरज–डॉ.रुपाली कुलकर्णी

## सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनाच्या परिसंवादात उमटला सूर

मानूर ।प्रतिनिधी

जागतिक महासत्तेच्या गोष्टी करत असताना महिलांना आजही अनेक क्षेत्रात मुभा नसल्याची बाब खेदजनक असून महिलांसाठी खाजगी कंपन्याकडून तयार करण्यात येणाऱ्या उत्पादनांवर लावण्यात येणारा पिंक टॅक्स हटविण्यासाठी महिलांनी उठाव करण्याची गरज असल्याचे मत स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयाच्या प्रा.डॉ.रुपाली कुलकर्णी यांनी व्यक्त केले.त्या राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरीत आयोजित केलेल्या सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनातील महिला सक्षमीकरण काळाची गरज या विषयावरील परिसंवादात बोलत होत्या.या वेळी परिसंवादात कालिकादेवी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.सुधीर येवले आणि प्रा.डॉ.नवनाथ पवळे यांचा सहभाग होता.पुढे बोलताना कुलकर्णी म्हणाल्या की,भारत हा जगाच्या पाठीवर




एकमेव असा देश आहे ज्या देशाची आयडॉल भारत माता अर्थात स्त्री आहे. स्त्रीला स्वतःचा दर्जा स्वतःच उंचवावा लागणार आहे.स्त्री आणि पुरुषांमध्ये वेतन असमानता अन्यायकारक बाब असून पुरुषांच्या तुलनेत अधिक संवेदनशील आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या स्त्रीला पुरुषापेक्षा अर्धाच पगार मिळतो.ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्यात तर महिलांना ऊसतोडणीचे काम करता यावे यासाठी त्यांच्या गर्भपिशवी काढून टाकण्याचे काम चिंताजनक असल्याचे देखील त्या म्हणाल्या.आर्थिक प्राप्तीसाठी जर स्त्रीला आपला एखादा अवयव गमवावा लागत असेल तर आपण जागतिक महासत्तेच्या दिशेने कशी वाटचाल करू शकतो? असा प्रश्न देखील त्यांनी या परिसंवादाच्या माध्यमातून उपस्थित केला.या वेळी संमेलनाध्यक्षा प्राचार्या डॉ.दिपाताई क्षीरसागर,एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड,सचिव पत्रकार गोकुळ पवार, संमेलनाच्या स्वागताध्यक्षा तथा एकताच्या सल्लागार ड.भाग्यश्री ढाकणे,महात्मा फुले विद्यालयाचे प्राचार्य बाबुराव जायभाये,जगदीश चेमटे, डॉ.बाळासाहेब सानप,फौजी कैलास खेडकर,देवीदास शिंदे यांनी परिसंवादाचा आनंद घेतला.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिचमध्ये उत्स्फूर्त स्वागत

दावोस ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये उपस्थित राहण्यासाठी आज झ्युरिच, स्वित्झर्लंड येथे आगमन झाले. हिंदू स्वयंसेवक संघ आणि सेवा स्वित्झर्लंड संस्थेच्या वतीने त्यांचे आनंदाने स्वागत करण्यात आले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान व्यक्त करत, स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने लेझीम खेळत त्यांचे स्वागत केले.याप्रसंगी, झ्युरिचमधील लहान मुलांनी मराठी गौरवगीत सादर करत 'पुन्हा येण्या'ची भावना अधोरेखित केली. वेदांत, हृषिकेश, रश्मी आणि अद्विका या चिमुकल्या दोस्तांनी आपल्या निरागस शुभेच्छा देऊन उपस्थितांचे मन जिंकले.या स्वागत समारंभाला भारतीय राजदूत मृदुलकुमार आणि उत्तर प्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह उपस्थित होते. सकाळी ६ वाजता झालेल्या या कार्यक्रमासाठी विविध भागांतून मराठी बांधव आवर्जून उपस्थित राहिले.मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उत्स्फूर्त स्वागताबद्दल आनंद व्यक्त करत म्हटले की, या स्वागताने मला घरच्याप्रमाणे वाटले. महाराष्ट्राच्या उर्जेची आणि 'वसुधैव कुटुंबकम'ची भावना येथे अनुभवली.मुख्यमंत्री फडणवीस 'दावोस समिट २०२५' साठी झ्युरिचमध्ये दाखल झाले आहेत.



बीड - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या प्रदेश संपर्क प्रमुखपदी वैभव स्वामी यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना सामाजिक कार्यकर्ते रमेश गंगाधरे, मच्छिंद्र कुंडलिक भालेराव, शेख अब्दुल गफार , पत्रकार शेख आयेशा आदी उपस्थित होते.

# महामार्गावर व्यायामाला जाताना काळजी घ्यावी: सपोनि.गजानन जाधव

**मांजसुंबा ।प्रतिनिधी**

**पोलीस भरतीची तयारी करणारे विद्यार्थी व युवकांसह वयोवृद्धांनी काळजी घेतली पाहिजे, त्यातून अपघातासारख्या घटना टळू शकतात. शहरातील युवकांनी शक्यतो मैदानावरच व्यायाम करावा. महामार्गावर अपघातामुळे दुर्देवी मृत्यू उद्भवतात त्यामुळे प्रत्येकाने काळजी घेवून शक्यतो मैदान किंवा गावातील रस्त्यावर व्यायाम करावे असे आवाहन स.पो.नि.गजानन जाधव यांनी केले आहे.**

याबाबत आवाहन करताना सपोनि.गजानन जाधव यांनी म्हटले आहे की, गेल्या काही वर्षात रस्ते अपघाताचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे. वाहतूकीच्या नियमांचे पालन



सर्वच वाहन चालक करताना दिसत नाही. अशा काळात वयोवृद्ध व युवकांनी महामार्गालगत व्यायाम करताना योग्य ती काळजी घ्यावी. शक्यतो महामार्गावर व्यायाम करणे टाळावे. जेणेकरुन अपघातासारख्या घटना टळू शकतात. महामार्ग पोलीस जनतेच्या सेवेत तत्पर आहेत असेही सपोनि.गजानन जाधव यांनी नमूद केले आहे.

# सोशल मिडीयापेक्षा वृत्तपत्रातील बातमींवर जास्त विश्वास - ॲड. आश्विनी धन्नावत

## मराठा महासंघ व पीसीएम जालनाच्यावतीने जाहीरात प्रतिनिधींचा सन्मान
## प्रिंट मिडिया डेव्हलपमेंट २०२५ चा पुरस्काराने नरेश कोरडे सन्मानित

जालना ।प्रतिनिधी

कुणी काही सांगितले अथवा सोशल मिडीयावरील वृत्तांपेक्षा वृत्तपत्रांमध्ये छापून आलेल्या बातम्यांवर आमचा जास्त विश्वास असल्याचे प्रतिपादन ॲड. आश्विनी धन्नावत यांनी येथे केले. मराठा महासंघ व पीसीएम जालनाच्यावतीने जाहीरात प्रतिनिधी व पत्रकारांचा सन्मान सोहळा सोमवार (दि १३) रोजी रेल्वे स्टेशन जवळील कृष्णा प्लाझा येथे आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी ॲड. आश्विनी धन्नावत बोलत होत्या. यावेळी ॲड. भास्कर मगरे, प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे (पीसीएम) राज्य सरचिटणीस महेश जोशी, विजय सकलेचा, हिंदु महासभेचे धनसिंह सुर्यवंशी, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडुळ, मराठा महासंघाचे अरविंद देशमुख, पीसीएमचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांचे अभिवादन करण्यात आले.पुढे बोलतांना ॲड. धन्नावत म्हणाल्या की, लोकशाहीतील महत्त्वाचा चौथा स्तंभ पत्रकार म्हणून आपण आहात आपल्यावर मोठी जबाबदारी आहे. कुणी सांगितले, किंवा सोशल मिडीयावर, व्हॉटस्अपवर देखील आम्ही विश्वास ठेवत नाही. यासंदर्भात त्यांनी एक व्हॉटस्अपवरील मॅसेजचे उदाहरण देत. वृत्तपत्रांवरील बातमींवर आम्हाला जास्त विश्वास असल्याचेही ॲड. धन्नावत यांनी म्हटले. जाहीरातींमुळे वृत्तपत्रे टिकली आहेत. फायनान्स हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे आणि वृत्तपत्रात जाहीरात मिळवून देणारे प्रतिनिधी हे वृत्तपत्राचा कणा असल्याचेही त्या म्हणाल्या. विधी संसर्ग बालकावरील वृत्त छापतांना त्यांचे नाव, ठिकाण छापू नका, त्यांची ओळख पटेल असे वृत्त देऊ नका असा सल्ला देतांना असे वृत्त आल्यास अशा विधीसंसर्ग बालकांचे पुढील आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते याबाबतीत काळजी घेण्याचा सल्लाही पत्रकारांना यावेळी ॲड. धन्नावत यांनी दिला.



ॲड. भास्कर मगरे म्हणाले की, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी रोजीच दर्पण वृत्तपत्र काढले होते तेव्हा पासून मराठी पत्रकारिता पुढे आली आहे. दर्पण दिनाच्या सर्व पत्रकारांना त्यांनी शुभेच्छा दिल्या ते म्हणाले की, कालातरांने मराठी पत्रकारितेला सदृढ, समृद्ध करण्याचे कार्य आपल्या सारख्या पत्रकारांनी केले आहे. समाजातील विविध प्रश्न मांडण्याचे काम पत्रकार करीत असतात. तळागाळातील प्रश्न ज्यात आर्थिक, सामाजिक, विज्ञानाचे अशा सर्वच प्रश्नांवर जनजागृती आणि उलगडा करण्याचे काम पत्रकार करत असतात दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार सोहळा पाहण्यास मी येथे उपस्थित झालो असल्याचेही ॲड. भास्कर मगरे यावेळी म्हणाले.

विजयकुमार सकलेचा म्हणाले की, मागील आठवड्यात प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या वतीने पत्रकारांचा सन्मानाचा मोठा कार्यक्रम सहा जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमात जाहिरात प्रतिनिधींचा सत्कार झाला नसल्याबाबत खेद व्यक्त केला. तसेच पुन्हा पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके व मराठा महासंघाचे अरविंद देशमुख यांनी जाहीरात प्रतिनिधींच्या सत्कारांचा योग घडवून आणला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. वृत्तपत्रात वितरण, संपादकीय विभाग, जाहीरातदार, बातमीदार आणि डीटीपी विभाग हे पाच प्रमुख घटक आहेत थोडक्यात लोकशाहीतील चौथा खांब असलेल्या वृत्तपत्रांसाठी हे पाच खांब महत्त्वाचे असल्याचे सांगून उपस्थित पत्रकारांना विजयकुमार सकलेचा यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रसगी जाहीरात व्यवस्थापक-प्रतिनिधींचा प्रिंट मिडीया डेव्हलपमेंट पुरस्कार २०२५ ने दैनिक लोकमतचे नरेश कोरडे यांना सन्मानित करण्यात आले. याच बरोबरच दैनिक आनंद नगरीचे गौरव संत, दै. सकाळचे संदीप खरात, गोपाल बुट्टे, दै. दिव्य मराठीचे विठ्ठल देंडगे यांना सन्मानित करण्यात आले. मंठा येथील अतुल खरात यांना युवा पत्रकार पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले. उपस्थित सर्व पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा महासंघाचे अरविंद देशमुख यांनी केले. अशोक पडुळ यांनी आभार मानले. तर अच्युत मोरे यांनी सुत्रसंचलन केले.यावेळी दर्पण जैन,नरेंद्र जोगड,सुहास वैद्य, आमेर खान, नरेंद्र जोगड, दिनेश नंद, शेख इस्माईल, सुनील भारती, मजहर सौदागर, संतोष भुतेकर, उमर शेख, राहुल मुळे, शेख शकील आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.

# धारूर येथील बुवाजी पाटील माध्यमिक विद्यालयात केंद्रप्रमुखांकडून पंचनामा

प्रतिनिधी । धारूर

धारूर येथील बुवाजी पाटील माध्यमिक विद्यालय मध्ये रविवारी मुक्त विद्यापीठाच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून सहा ते सात हजार रुपये वसूल करण्यात येत होते .या ठिकाणी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आले होते .अचानक विद्यार्थ्यांची गर्दी जमल्यामुळे धारूर येथील केंद्राचे केंद्रप्रमुख सय्यद हाकिम यांनी सदरील प्रकाराचा पंचनामा केला .यामुळे प्रवेशबाबत संशय वाढल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली .



धारूर येथील पोलीस ठाणे रोड लगत बुवाजी पाटील जूनियर कॉलेज आहे .सदरील कॉलेज हे मागील काही वर्षापासून बंद आहे .असे असताना अचानक रविवारी या कॉलेजमध्ये गर्दी जमली होती .या कॉलेजमध्ये महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित झाले होते .अचानक या कॉलेजमध्ये कशा साठी प्रवेश सुरू आहेत या संदर्भात नागरिकांना संभ्रम निर्माण झाला होता .या ठिकाणी मतीन सय्यद नावाची व्यक्ती मुक्त विद्यापीठाच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून ७ हजार रुपये जमा करून नोंदणी करीत होती .कशासाठी एवढी फीस जमा करण्यात येत आहे याबद्दल अनेकजण चर्चा करीत होते .यासंदर्भात धारूर येथील काही पत्रकारांनी या संदर्भात गटशिक्षणाधिकारी यांना संपर्क साधला असता त्यांनी केंद्रप्रमुख सय्यद हकीम यांना सदर घटनेचा पंचनामा करण्यासाठी तोंडी सूचित केले होते .त्यावरून केंद्रप्रमुख सय्यद हकीम यांनी बुवाजी पाटील जुनियर ज्युनिअर कॉलेजमध्ये जाऊन रविवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास पंचनामा केला .यावेळी केंद्रप्रमुख येताच सदरील प्रवेश अचानक बंद करण्यात आले .पंचनाम्यादरम्यान सदरील आलेले उपस्थित विद्यार्थ्यांनी पळ काढला .यावेळी प्रवेश घेणाऱ्यांची घाबरमुंडी उडाली होती . या वेळी कॉलेजचे पाचार्य श्रीनिवास लांब उपस्थित होते .नेमका काय प्रकार आहे याबाबत विद्यार्थी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता .केंद्रप्रमुखांनी केलेल्या पंचनाम्यावर आता शिक्षण विभाग काय कारवाई करते याकडे लक्ष लागले आहे

# बस अपघातातील मृत तरुणांच्या कुटुंबियांना राज्य शासनाने प्रत्येकी किमान दहा लाख मदत द्यावी

## सामाजिक कार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले

केज/प्रतिनिधी

घोडका राजुरी फाट्यावर झालेल्या बस अपघातात मृत झालेले तरुण सुबोध बाबासाहेब मोरे,ओम सुग्रीव घोडके,विराट बब्रुवान घोडके व जखमी अन्य दोघांना राज्य परिवहन महामंडळाकडून नियमानुसार मदत मिळायलाच हवी परंतु याशिवाय हीमुले कुटुंबाचा प्रमुख आधार बनण्या साठी नोकरीच्या शोधात असताना त्यांना दुर्दैवी मृत्यू झालेला आहे.अशा वेळी राज्यशासनानेही विशेष मदत म्हणून या मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी किमान दहा लाख रुपये

व जखमींना किमान पाच लाखाची तात्काळ मदत करावी अशीमागणी सामाजिक कार्यकर्ते प्रा. हनुमंत भोसले यांनी केली आहे.गेली अनेक वर्षा पासून महाराष्ट्रात भरती प्रक्रिया बंद आहे.केवळ पोलीस खात्यात अधून मधून थोडयाफार जागा



निघतात.त्यामुळे या जागे साठी महाराष्ट्रातील युवकांमध्ये मोठी स्पर्धा असते.पोलीस भरतीसाठी शारीरिक व बौद्धिक अशा दोन स्तरावर परीक्षा होत असल्याने फिजिकलमध्ये सर्वाधिक गुण मिळावेत यासाठी हे युवक प्रचंड सराव करतात.महाराष्ट्रात अगदी तालुका पातळीवर देखील धावण्यासाठी मैदाने उपलब्ध नसल्याने या युवकांना गावचे रहदारीचे प्रमुख रस्ते व शहरातील प्रमुखमहामार्गा वर आपला धावण्याचा सराव पूर्ण करावालागतो. अशा रस्त्यावर हल्ली मोठी रहदारी असल्याने सराव करताना त्यांचेजीव धोक्यात येतात.सराव करताना उत्साहाच्या व जोशात रस्त्यावरची वाहने व त्यांच्या पासूनचे धोके लक्षात न आल्याने अपघात होतात.यापूर्वीही असा सराव करताना अनेक युवकांना आपले जीव गमवावे लागले आहेत.यासाठी यापुढे किमान बीड जिल्ह्यातील युवकांनी एकतर मैदाना वरच सराव करावा किंवा रस्त्यावर सराव करताना रस्त्याची सुरक्षितता पाहूनच सराव करावा असे आवाहनही हनुमंत भोसले यांनी केले आहे.

# महाराष्ट्र विद्यालयाची शैक्षणीक सहल (क्षेत्रभेट) उत्साहात संपन्न

परळी / प्रतिनिधी

परळी भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी मोठी शाळा म्हणून ओळख असलेल्या मोहा येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित महाराष्ट्र विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न झाली.देशातील महत्वपूर्ण, ऐतिहासिक, प्राचीन व दोन राज्याची राजधानी असलेल्या हैदराबाद याठिकाणी ही शैक्षणिक सहल (क्षेत्रभेट) आयोजित करण्यात आली होती.शैक्षणिक सहलीमध्ये ऐतिहासिक गोवळ कोंडा किल्ला, सालारजंग वस्तू संग्रहालय, लुम्बिनी पार्क, हुसेन सागर बुद्ध पुतळा,बोटिंग, देशातील सर्वात उंच असलेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब




आंबेडकर यांचा पुतळा, प्रशासकीय सचिवालय, नेहरू प्राणी संग्रहालय, बिर्ला मंदिर, तारांगण, सायन्स म्युझियम, एनटीआर गार्डन

देशातील नावाजलेले उस्मानिया विद्यापीठ, आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, नेकलेस रोड,चौ-महल पॅलेस, चार मिनार, बाजार पेठ आदी विविध ऐतिहासिक, प्राचीन, वैज्ञानिक क्षेत्राला भेट देत अवलोकन करत माहिती मिळविली. विद्यार्थ्यांमध्ये धाडस, निर्भीडतपणा निर्माण व्हावा, सहकार्य, संघटन, नेतृत्वकौशल्य निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये पर्यटनाची आवड निर्माण करणे, विद्यार्थ्याचे निरीक्षण शक्ती निर्माण करणे, विद्यार्थ्यांना भौगोलिक परिसराची माहिती करून देणे, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकता आणि एकात्मता निर्माण करणे या उद्देशाने या सहलीचे नियोजन करण्यात आले होते.

शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे, सहल प्रमुख अंगद पेड्डेवाड, जेष्ठ शिक्षक हनुमंत वाघमोडे, खय्युम शेख, अरुण गोचडे, विजय गणगे, नटवर पटले, अनुप कुसुमकर सर श्रीमती फड व श्रीमती जाधव मॅडम, परवेज सय्यद आदींनी विशेष मेहनत घेतली. या सहलीत ७४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत सहलीचा आंनद घेतला.

# वसुंधरा माध्यमिक विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

## शालेय क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू घडतात -डॉ. हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात खेळ अत्यंत महत्त्वाचा असतो.या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू घडतात असे मत उदघाटक डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते पैठण येथील वसुंधरा माध्यमिक विद्यालयात क्रीडा स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमात उद्घाटक म्हणून बोलत होते. उपस्थितांच्या हस्ते नाणेफेक करून कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.प्रति वर्षी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त कै.भुजंगराव सेवा प्रतिष्ठान सारणी संचलित वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण मध्ये क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात.क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उद्घाटक डॉ.हनुमंत



सौदागर,परमेश्वर चौधरी यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांमध्ये बंधुता, समता,संघटन कौशल्य, शारीरिक आरोग्य, संपन्नता बौद्धिक विकास इत्यादी गुण विकसित करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.सौदागर यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना या विद्यालयातून प्रियंका इंगळे सारखे भारतीय संघाचे नेतृत्व करणारे खेळाडू निर्माण व्हावेत आणि होतील असा आशावाद व्यक्त करून क्रीडा स्पर्धेतील सर्व खेळाडूंना शुभेच्छादिल्या.मुख्याध्यापक सुशीलकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा विभाग प्रमुख अनिल सरवदे यांच्या नियंत्रणात घेतल्या जात आहेत या स्पर्धेसाठी इयत्ता पाचवी ते बारावी विद्यार्थी मोठ्या उत्साहात सहभागी होतात.या स्पर्धे साठी सहशिक्षक अशोक चौधरी,हनुमान चौधरी श्रीमती तोडकर ,श्रीमती डाके,नवनाथ गायकवाड, आबासाहेब बिक्कड, अतुल साखरे,अमित शिनगारे,शशिकांत पवार, मनोज शिनगारे,प्रसाद कुलकर्णी,श्री.बारसागडे यांचे विशेष योगदान आहे.कबड्डी स्पर्धेसाठी एका संघाला उपस्थितां च्या हस्ते नाणेफेक करून सुरुवात करण्यात आली.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठानचा युवा सप्ताहाचा समारोप

केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठान यांच्या युवा सप्ताहाचा समारोप दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आला.दिनांक १२ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत खास युवतीं साठी व युवकांसाठी १५ ते ३५ वयोगटातील युवक युवतींसाठी या सप्ताहा निमित्त विविधसांस्कृतिक व क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.दि.१२ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त संयुक्त जयंती प्रतिमेला युवतींचा हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यावेळी युवतींनी गीत गायन व उस्फुर्त भाषण केले.दि.

१३ जानेवारी २०२५ रोजी तरुणींसाठी लंगडी स्पर्धा व अविष्कार स्पर्धा घेण्यात आल्या.अविष्कार स्पर्धेत,भजन,गौळण



सादरीकरण,अभंग सादरीकरण,गीत गायन, भारुड,काव्यवाचन इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.दि.१४ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन युवक,युवतींसाठी घेण्यात आले.यात शेकडो युवक, युवतींनी सहभाग नोंदविला.दि.१५जानेवारी २०२५ रोजी संगीत खुर्ची घेणात आली. युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.दि.१६ जानेवारी २०२५ रोजी तीन टांगी

दौड घेण्यात आली.दि. १७ जानेवारी २०२५रोजी लांब उडी,उंच उडी,धावणे इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या दि.१८ जानेवारी २०२५ रोजी कब्बडी व खो खो स्पर्धा युवतीसाठी घेण्यात आली.तसेच १२ ते १८ जानेवारी २०२५ या सलग सात दिवस कालावधीत स्वयंरोजगार शिबीर युवतीसाठीघेण्यात आले.सलग सात दिवस चाललेल्या युवासप्ताहाची सांगता समारोप दि.१९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आला.समारोप कार्यक्रमाला प्रमुखपाहुणे म्हणून रमेश आबा गायकवाड, रविंद्र गायकवाड,नारायण भाऊ गायकवाड,शिवाजी नाना गायकवाड यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते,व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.युवकांनो झेप घ्या, दिशा तुम्हाला शरणयेतील हे स्वामी विवेकानंदांचे युवकांसाठीचे ब्रीदवाक्य युवतींनी लक्षात ठेवू ध्येय निश्चित करावे व ध्येय प्राप्तीसाठी कष्टरूपी साधना करावी असे अवाहन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. तसेच जिजामातेने शिवबा घडवताना जी शिकवण स्वतः अंगीकारली आणि शिवबांना छत्रपती घडवताना शिकवली ती सचोटी,त्याग,दुर्दम्य इच्छा शक्ती,आत्मविश्वास, औदार्य,परधर्म सहिष्णूता माणसे जोडण्याची कला, प्रसंगी कठोरता,प्रसंगी प्रेम,माया,ममता आणि आत्मीयता अंगीबाळगावी हि स्वराज्य जननी राजमाता राष्ट्रमाता जिजा मातेचा आदर्श डोळ्या समोर ठेवून भावी वाटचाल करावी,उद्याचे भविष्य उज्वल असेल यात तिळमात्र शंका नाही असे प्रतिपादन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.आभार प्रदर्शन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# सय्यद नजीब मौलाना सहाब यांचे निधन; मुस्लिम समाजात शोककळा




बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर (प्रमुख) सय्यद नजीब मौलाना सहाब यांचे शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.आज, रविवार सकाळी ११.३० वाजता बिंदुसरा नदी परिसरातील इजतेमा मैदान येथे त्यांची जनाजा नमाज अदा करण्यात आली. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य तबलीग जमातचे प्रमुख (अमीर सहाब) हाफीज मंजूर सहाब, मौलाना महेमुद सहाब, मौलाना लईक सहाब, मौलाना रईस सहाब, तसेच राज्यभरातील अलिम, मुफ्ती, मौलाना व जिल्ह्यातील मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाज अदा केल्यानंतर त्यांचा दफन विधी मासूम कॉलनी, मोमीनपुरा येथील कब्रस्तानमध्ये करण्यात आला.सय्यद नजीब सहाब यांचा जनाजा मर्कज मस्जिद, राजुरी वेस येथून काढण्यात आला. जनाजा राजुरी वेस, बशीर गंज चौक, जुने एसपी ऑफिस समोरील रोड, खासबाग रोड मार्गे इजतेमा मैदान येथे दाखल झाला. जनाजामध्ये जिल्हाभरातून आलेल्या मुस्लिम समाज बांधवांनी सहभागी होऊन आदरांजली अर्पण केली.सय्यद नजीब सहाब हे बीड शहरातील कारंजा भागातील रहिवासी होते. ते काही वर्षांपासून आजारी होते व त्यांच्यावर काकू नराना हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. त्यांच्या निधनाने मुस्लिम समाजामध्ये शोककळा पसरली आहे. बीड प्रसार परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

## शासनाच्या हमीभाव खरेदी केंद्रावर बारदाना अभावी सोयाबीन खरेदी केंद्र बंद केज तालुक्या तील शेतकरी चिंतेत

### शेतकऱ्यांवर संकट,अल्प दराने खाजगी केंद्रावर सोयाबीन विक्रीची वेळ

केज/प्रतिनिधी

राज्य सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावाने खरेदी करण्या साठी खरेदी केंद्र उपलब्ध करून दिले.ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाल्या. बारदाना उपलब्ध नसल्याने सोयाबीनखरेदी केंद्र बंद आहेत.खरेदीकेंद्र कधी सुरू होणार म्हणून शेतकरी चिंतेत आहेत. तात्काळ खरेदी केंद्र सुरू करा अशी मागणी केली जात आहे.केजतालुक्यात चिंचोली माळी,होळ, बनसारोळा,नांदुरघाट ही राज्य सरकारची अधिकृत हमीभाव खरेदीकेंद्रआहेत

युसूफवडगाव येथील खरेदी केंद्र हे महाकिसान संघाचेआहे.वडगावयेथील खरेदी केंद्राने स्वतः बारदाना खरेदी करून खरेदी चालू ठेवलेली आहे तर इतर खरेदी केंद्रात खरेदी बंद आहे.शासना कडे वारंवार मागणी करूनही बारदान उपलब्ध होत नाही.ऑनलाइन नोंदणी करून शेतकरी चकरा मारत आहेत. प्रत्येक सोयाबीन खरेदी केंद्राकडे दोन ते अडीच हजार शेतकऱ्यांनीनोंदणी केलेली आहे.खाजगी खरेदी केंद्रावर बाजार भाव ४१५० आहे तर शासनाने जाहीर केलेला हमीभाव ४८९२ रुपये आहे.शेतकरी नोंदणी करून मॅसेजची वाट बघत आहेत तर मॅसेज आलेल्या शेतकऱ्यांनाही बारदाना उपलब्ध नसल्याने खरेदी केंद्र बंद असल्याचे सांगितले जाते एकीकडे दि.३१ जानेवारी पर्यंत खरेदी पूर्ण करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिले आहेत आणि अद्याप खरेदी केंद्र सुरूच नाहीत यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे.सोयाबीन मळणी करून अडीच महिन्याचा कालावधी उलटून गेला माल विक्रीसाठी तयार आहे.मात्र शासन धोरण हे कुचकामी ठरत आहे

शेतकऱ्यांनी खाजगी सावकार,उधार देणारे कृषी दुकानदार विविध ठिकाणावरून उधारीवर घेतलेले खते बियाणे याचे या पैशाचा तगादा सुरू आहे.हमीभाव केंद्र केवळ नावालाच आहेत. शेतकऱ्यांना नाईलाजाने सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांकडे विक्री करावी लागत आहे. खाजगी व्यापारी कमी भावाने सोयाबीन खरेदी करून शेतकऱ्यांची लूट करत आहेत.खरेदी केंद्रावर चार दिवसात बारदान उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहोत अशी माहिती डीडीआर श्री. वाजपेयी यांनी दिली.नोंदणी करून महिना होऊन गेला अद्यापअजून मॅसेज आलेला नाही.कृषी दुकानदार लोकांची उसनवार परत करण्या साठी पैशाचीआवश्यकता आहे मात्र सोयाबीन विकणार

## इ.पी.एस.९५ दि.२२.०१.२०२५ रोजी जालना येथे मेळावा

बीड (प्रतिनिधी) : इ.पी.एस.९५ जिल्हा बीडचे सर्व पेंशनधारक व संघर्ष समितीचे सर्व पदाधिकारी येणारी दिनांक २२.०१.२०२५ रोज बुधवारी जालना येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करून या मेळाव्यास मा. कमांडार अशोक राऊत व त्यांचे सर्व राष्ट्रीय पदाधिकारी व केंद्रीय मान्यवर येणार असून मराठवाड्यातील पदाधिकारी मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यास मा. कमांडार अशोक राऊत हे या दोन तीन महिण्यात संघटनेला सरकारने जो प्रतिसाद देवून माहिती पेंशन वाढी बाबत दिलेली आहे. ती माहिती कमांडार जालना येथे मेळाव्यात देणार असून संघर्ष समितीची नविन वर्षातील हालचाली बाबतही माहिती सांगणार आहेत. दिल्लीतील मिटिंग पेंशन वाढीची माहिती देणार,

तरी बीड जिल्हा इ.पी.एस.९५ चे सर्व सभासद व पदाधिकारी या जालना मेळाव्यास हजारोंच्या संख्येत उपस्थित राहण्याचे आवाहन बीड संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री. सय्यद हमीद, अरुण खोडसकर, बबन वडमारे, भारतराव निसर्गंध, कुलकर्णी एस. आर., चंदु गायकवाड हे सर्व पदाधिकारी करीत आहेत.

## पालकमंत्री अजित पवारांचा बीडला बायपास

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील पालकमंत्री १८ जानेवारी रोजी जाहीर केले.बीडच्या अंतर्गत राजकीय वादामुळे बीडचे पालकमंत्री पद महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देण्यात आले.पालकमंत्री म्हणून त्यांनी बीडचे पालकत्व स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी १९ जानेवारी रोजी त्यांना बारामती वरून बीड मार्गे जालन्याला जाण्याचा योग आला.मात्र दादांनी बीडमध्ये न येता बायपास वरून थेट अंबड मार्गे जालन्याकडे प्रस्थान केले. त्यामुळे बीडच्या पालकमंत्र्यांनी पालकत्व स्वीकारल्यानंतर आपल्या पहिल्याच दौऱ्यात बीडला बायपास केले.

## बीडकरांसाठी आनंदाची बातमी, खो खो मधील पहिल्या विश्वविजयात कर्णधार म्हणून बीडच्या प्रियंका इंगळेची चमकदार कामगिरी



मुंबई /प्रतिनिधी

पहिला वहिला खो-खो वर्ल्ड कप नुकताच दिल्लीमध्ये पार पडला. या स्पर्धेत भारताच्या महिला संघाने रविवारी (१९ जानेवारी) विजेतेपदाला गवसणी घातली आहे. भारतीय महिला संघाने अंतिम सामन्यात नेपाळला ७८-४० फरकाने पराभवाचा धक्का दिला.यासह भारतीय संघाने पहिलाच वर्ल्ड कप आपल्या नावावर केला.मुळची महाराष्ट्रातील बीडची असलेल्या प्रियंका इंगळेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय महिला संघाने सुरुवातीपासूनच या सामन्यात वर्चस्व ठेवले होत. त्यांनी नेपाळला कोणत्याही क्षणी पुनरागमनाची संधी दिली नाही.अंतिम सामन्यात भारतीय संघाचा चपळ खेळ पुन्हा दिसून आला. महिला संघाने सांघिक कामगिरी आणि अचूक रणनीतीमुळे नेपाळला पराभवाचा धक्का दिला. यामुळे बीड जिल्ह्याचे नाव देशस्तरावर उज्वल झाले आहे.

चपळाई, अचूकता आणि जिद्दीच्या जोरावर भारतीय खेळाडूंनी या सामन्यात एकतर्फी वर्चस्व सिद्ध केलं होतं. भारताच्या या विजयाचे देशभरातून कौतुक होत आहे.

अंतिम सामन्यात पहिल्या राउंडमध्ये भारताने आक्रमक सुरुवात केली. भारताने नेपाळची पहिली तुकडी ५० सेकंदातच बाद केली. त्यानंतर दुसरी तुकडी १.४८ मिनिटात, तिसरी तुकडी १.२० मिनिटात, तर चौथी तुकडी १ मिनिटात बाद केली. पाचवी तुकडी ४५ सेकंदात बाद केली, त्यानंतर उर्वरित २ खेळाडू ३४ सेकंदात बाद केले. त्यामुळे भाकताने ३४ गुण मिळवले. भारतासाठी कर्णधार प्रियंका इंगळे, रेश्मा राठोड यांची कामगिरी चांगली राहिली.

दुसऱ्या राउंडमध्ये नेपाळनेही कमालीचा खेळ केला होता आणि भारताच्या ड्रीम रन गुणांना वेसन घातले. भारताची पहिली तुकडी ३ मिनिटानंतर बाद झाली. दुसरी तुकडी १.३९ मिनिटात बाद करण्याच नेपाळने यश मिळवले, तर तिसरी तुकडी ५३ सेकंदातच बाद झाल्याने भारताला धक्का बसला होता. पण नेपाळने चौथी तुकडी १.१३ मिनिटात बाद केले. मात्र पाचवी तुकडी नाबाद राहिल्याने भारताने मध्यंतरापर्यंत ३५-२४ अशी आघाडी घेतली.

तिसऱ्या राउंडमध्ये भारताने नेपाळची पहिली तुकडी १.४२ मिनिटात बाद केली. त्यानंतर दुसरी तुकडी ३३ सेकंदात, तिसरी तुकटी १.७ मिनिटात बाद केली. चौथी तुकडी ५० सेकंदात माघारी परतली. पाचव्या तुकडीला ५५ सेकंदात, तर सहाव्या तुकडीला ३४ सेकंदात बाद केले. सातव्या तुकडीतही एक खेळाडू बाद झाली. त्यामुळे भारताने ७३-२४ अशी आघाडी घेतली. नेपाळकडून दीप बी केने चमकदार खेळ केला.

चौथ्या राउंडमध्ये नेपाळला संघर्ष करायला लावला. भारताच्या पहिल्या तुकडीने ५.१४ मिनिटांचा वेळ घेतला. त्यामुळे भारताने हा सामना ७८-४० असा जिंकला.या स्पर्धेत साखळी फेरीत भारताने दक्षिण कोरिया, इराण आणि मलेशियाला पराभूत केलं होतं. त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत भारताने बांगलादेशवर विजय मिळवला, तर उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेला पराभूत केलं होतं.


या विजयानंतर प्रियंकाने म्हटले की हा विजय केवळ आमच्या संघाचा नव्हे, तर प्रत्येक भारतीय महिलेच्या स्वप्नांचा विजय आहे. या विश्वचषकासाठी आम्ही महिनोंमहिने कष्ट घेतले, प्रत्येक खेळाडूने आपले १०० टक्के योगदान दिले,



## भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा संत महनतांच्या वतीने भव्य सत्कार संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नामांकित संयोग नगर परिसरामध्ये असलेले इस्कॉन म्हणजेच श्री भगवान राधा श्रीकृष्णाचे दिव्य भव्य असे इस्कॉन मंदिर आज वर्धापन दिनानिमित्त बीड शहरातून सर्वत्र श्री राधाकृष्ण यांचे दिव्य भव्य अशी प्रभायात्रा संपन्न झाले याच पार्श्वभूमीवर या यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्याचे उपाध्यक्ष तथा भाजपा नेते तथा देश देव आणि धर्म या संतांच्या ब्रीद वाक्याला म्हणून सातत्याने बीड जिल्ह्यासह शहरामध्ये सातत्याने धार्मिक कार्यामध्ये अतिशय अग्रेसर असलेले नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रभायात्रेमध्ये भेट देऊन श्री भगवान श्रीकृष्णाच्या रथाची दोर हातात धरून रथ देखील त्यांच्या वतीने वाढण्यात आला याच पार्श्वभूमीवर येथे असणारे श्री पुजारी साधुसंत महंत यांच्या वतीने नवनाथांना शिरोळे पाटील यांच्या उत्कृष्ट धार्मिक कार्याचे कौतुक करून त्यांना उदंड आयुष्य लाभावे या उद्देशाने श्री साधु संतांनी श्री भगवान कृष्णाकडे प्रार्थना केली व आशीर्वाद दिला आणि त्यांचा दिव्य भव्य असा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला या प्रसंगी बीड शहरातील तमाम श्रीकृष्ण भक्त उपस्थित होते .




## शिरूर शहरातील मेन रस्त्यावरील धूळ घेते शिरूरकरांचा जीव

शिरूर ।प्रतिनिधी

दिनांक १९ शिरूर शहरातील मेन रस्ता महत्त्वाचा व राजकीय दूरदृष्टी कोणातून महत्त्वाचा असलेला शिरूर शहरातील सध्या धुळीच्या प्रदूषणाने चांगलाच गिळकृत झाला आहे शहरातील हवा जनधुळीने व्यापली आहे आणि यामुळे व्यापाऱ्यांना ग्राहकांना व स्थानिक नागरिकांना वेगवेगळ्या आरोग्यांच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे या रस्त्यावरील धुळीच्या समस्या नेहमी चर्चेत असतानाही शासकीय यंत्रणा यावर ठोस उपयोजना करण्यात अपयशी ठरली आहे शिरूर शहरांमधील मुख्य बाजारपेठेतील असलेल्या रस्त्याची बिघडलेली अवस्थेने धुळीचे प्रमाण वाढले आहे या धुळीने विविध आजारांचे प्रमाण वाढले असून श्वसन मार्गाच्या समस्या दमा घसा खवखवणे डोळ्यांची जळजळ आणि फुफुसांच्या विकारांचा धोका सानिकावर रगवत आहे शिरूर शहर हे शहर काळ्या मातीमध्ये बसलेले असल्यामुळे धुळीचे प्रमाण जास्त आहे पांढरा फुफाटा भुरकट तसेच पांढरी माती जास्त प्रमाणात आहे मुख्य बाजारपेठेत रस्त्यावरून भरधाव वाहने धावतात त्यामागे वारा सुटतो आणि त्या धुळीचे कण हवेत मिसळतात या धुळीच्या कानाने नुसते जीवन असाही केले आहे शहरातील सर्वजण आबला वृद्ध व्यापारी वर्ग शाळेकरी मुले धुळीच्या त्रासामुळे बाधित झाले आहेत पदाचारी आणि वाहन चालकांना रस्त्यावर चालणे खूप कठीण बनले आहे व्यापारी दुकाने व हॉटेल धुळीमुळे तडाख्याला आली आहेत आणि ग्राहकांची संख्या घठली आहे किराणा दुकानात धुळ शिरल्याने मालाची गोडी आणि गुणवत्ता नष्ट होत आहे ज्यावेळी निवडणुकांचा प्रचार असतो तेव्हा पुढारी आश्वासन देतात अनेक निवडणुका या धुळीच्या समस्यावर भाष्य केले गेले आहे परंतु त्यानंतर त्यावर कारवाई होत नाही पुढार्यांना फक्त प्रचारासाठीच गावात येण्याची आठवण असते पण त्यांच्या आश्वासनाचा काहीच उपयोग ठरत नाही यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे याच पार्श्वभूमीवर शिरूर शहरातील रस्ते पाणी विकास व शिरूर शहरातील नागरिकांच्या मेन रस्त्यामुळे बिघडलेल्या परिस्थितीमुळे शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिरूर तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी या समस्यासाठी वारंवार जिल्हाधिकारी साहेबांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे व या रस्त्याची दुरुस्ती करणे डिव्हायडर करणे डांबरीकरण करणे व्यवस्थित या रस्त्याचं बांधकाम करणे यासाठी खूप वेळा निदर्शने केली आहेत व या शहरातील नागरिकांच्या त्यांचा जीव धोक्यात आहे तेव्हा या धुळीचा प्रदूषणावर त्वरित उपयोजना कराव्यात आमच्या जीवाशी खेळण्याचे काम थांबवा अशी भावनिक मागणी शिवसेनेच्या नेत्यांकडे नागरिक करत आहेत शिरूर येथील लोकांची अवस्था इतकी गंभीर झाली आहे की आता त्यांना जिल्हाधिकारी यांच्याकडून मदतीची आशा आहे



### शिरूर शहरातील रस्ता हा महत्त्वाचा मुद्दा

धुळीच्या मुख्य कारणांपैकी एक म्हणजे शिरूर शहरातील रस्त्यांची वाईट अवस्था व त्यावरून होत असलेले वाहतूक मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरून भरधाव पद्धतीने वाहने पळवली जातात त्यामुळे धूळ मोठ्या प्रमाणात उडते गेल्या काही दिवसापूर्वी मुख्य बाजारपेठेतील सिमेंट रस्ता करण्यात आला मात्र त्यावरील सिमेंटचा फुफाटा अति प्रमाणात उडत आहे तसेच शिरूर शहरातील राख यांच्या दुकानापासून ते सिमेंट रस्ता अतिशय निकृष्ट दर्जेचा झालेला आहे अवघ्या वर्षभरातच या रस्त्याचे तीन तेरा वाजले आहेत त्यानंतर रस्त्याची पूर्वतस्थिती परत न करता तिथे धुळीचा साच तयार झाला आहे या धुळीच्या कणाणी सर्वोच्च क्षेत्रांना प्रभावित केले आहे

# मी अभिमन्यु नाही, तर अर्जुन आहे !

## कार्यकर्त्याला ताकत देताना विश्वास महत्त्वाचा, धनंजय मुंडेंचे शिर्डीत आक्रमक भाषण

अहिल्या नगर(प्रशांत बाफना)

मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून अजितदादांच्या प्रत्येक निर्णयात ठामपणे सोबत उभा राहिलो. पक्षाच्या वाईट काळात वेगवेगळी आंदोलने, यात्रा आदींच्या माध्यमातून अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. मात्र आता बीड जिल्ह्यातील एका दुर्दैवी हत्या प्रकरणाच्या आडून मला जाणीवपूर्वक, ठरवून टार्गेट केले जात आहे. महायुतीतील नेत्यांकडूनच मला लक्ष्य केले जात आहे, याचेच जास्त वाईट वाटते, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिर्डी येथे सुरू असलेल्या नवसंकल्प शिबिराच्या व्यासपीठावरून मुंडेंनी आक्रमक भाषण केले. ते म्हणाले, पक्षातील काही लोकदेखील दादांच्या कानाला लागून चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत. मात्र तरीही माझी भूमिका व वस्तुस्थितीची जाणीव दादांना आहे. त्यामुळे या कठीण काळातही पक्ष म्हणून दादा माझ्या पाठीशी उभे आहेत. आज कुणी निराधार व बिनबुडाचे कितीही आरोप करून मला अडकवण्याचा, माझा अभिमन्यु करण्याचा प्रयत्न केला तरीही उपयोग होणार नाही. कारण मी अभिमन्यु नाही, तर मी अर्जुन आहे. अजित दादांनी आता बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे, याचा आनंदच आहे.

बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात झालेली स्व.संतोष देशमुख यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक होती. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावरच लटकवले पाहिजे, हे माझे पहिल्या दिवसापासून स्पष्ट मत आहे. गुन्हेगारी ही एक नीच वृत्ती आहे. त्याला जात धर्म नसतो. मात्र या घटनेच्या आडून जात म्हणून एका समाजाला जाणीवपूर्वक गुन्हेगार ठरवले जात आहे. सातत्याने आमची मीडिया ट्रायल केली जात आहे. याबद्दल धनंजय मुंडे यांनी खंत व्यक्त केली .तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला




आम्ही शिंगावर घेतले. पक्षात आल्यापासून आजवरच्या वाटचालीत आमचे नेते म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहिलो. अनेक प्रसंगी अजितदादांना खलनायक ठरवण्याचा प्रयत्न झाला. तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला आम्ही शिंगावर घेतले. २०१४ – १९ या काळात विरोधी पक्षनेतेपदी काम केले. पक्षाच्या पडत्या काळात चार वेळा हल्लाबोल, परिवर्तन, शिवस्वराज्य यात्रांमध्ये सहभागी होऊन सबंध महाराष्ट्र पिंजून काढला. तत्कालीन सरकारला वाकवायचे काम केले.

२०१९ साली पहाटेची शपथ घेऊ नका हे मी सांगितले होते. ती शपथ त्यांनी घेतली पण शिक्षा मात्र मला मिळाली, अशी खंतही धनंजय मुंडे यांनी आज प्रथमच बोलून दाखवली. सामाजिक न्याय मंत्री म्हणून मी चांगले काम करून दाखवले. गाव – वस्त्यांची जातीवाचक नावे बदलणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांसारखे अनेक क्रांतिकारी निर्णय त्या काळात घेतले. ११ हजार कोटी रुपये पीकविमा एका वर्षात मिळवून देणारा कृषिमंत्री मी, मात्र त्यावरूनही टीका झाली. मात्र अर्धवट माहिती देऊन बदनामी करणारे लोक यावर बोलत नाहीत, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

खरे दुखणे..

लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक ठिकाणी युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मी गेलो होतो. त्यावेळी बारामती लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा वहिनींच्या प्रचारासाठी जाऊ नकोस, अन्यथा पुढे विधानसभेत त्याचा तुला त्रास होईल, असा सल्ला मला अनेकांनी दिला होता. मात्र तरीही मी गेलो. माझ्यासह अनेकांना विधानसभा निवडणुकीत ठरवून टार्गेट केले गेले.

मी माझ्या परळीच्या जनतेच्या आशीर्वादाने एक लाख चाळीस हजार मतांच्या लिडने निवडून आलो, त्याचीच पोटदुखी अनेकांना प्रकर्षाने झाली. ठाण्यात मी पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचाराला गेलो म्हणून तिथले नेते बीडमध्ये येऊन मला टार्गेट करत आहे, हेही उघड झाले. आहे. विधानसभा निवडणुकीत मी केवळ ५ दिवस पूर्णवेळ परळीत होतो, उर्वरित वेळेत मी पक्षाच्या अनेक उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या, बैठका घेतल्या. त्यातील बहुतांश उमेदवार निवडून आले, असेही मुंडे म्हणाले.

मी काम करणारा कार्यकर्ता..

मी सतत काम करणारा एक कार्यकर्ता आहे, नेता फक्त नावाला आहे. माझ्यातला कार्यकर्ता कधीच मरणार नाही. मी एक निष्ठावान कार्यकर्ता आहे. पक्ष नेतृत्वाने पाँडिचेरीमध्ये जाऊन पक्ष विस्ताराचे काम कर म्हंटले तर तिथे जाऊनही मी काम करेल. पक्षाला सुद्धा कार्यकर्ताभिमुख व्हावे लागेल. कार्यकर्त्याला ताकत देताना संपूर्ण विश्वासदेखील ठेवणे आवश्यक आहे. तेव्हाच पक्ष संघटना मजबूत होईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये पक्षाचा कार्यकर्ता कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

बीड जिल्हा अन् सामाजिक सलोखा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर झालेल्या मीडिया ट्रायल, सोशल मीडियावरील चिखलफेक, साधलेले राजकारण अशा अनेक गोष्टींनी जिल्ह्याचे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. आपला पक्ष शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. त्यामुळे आता आमच्या बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारीसुद्धा सर्वांना घ्यावी लागेल.ऊसतोड करून, कष्ट करून, कोरडवाहू शेती करून जगणारे आम्ही सामान्य लोक आहोत. आमचा जिल्हा बिहार आणि आमची परळी तालिबान, अशीच बदनामी सुरू राहिली, तर पुढच्या महिन्यात महाशिवरात्री आहे.

## वीजग्राहकांना महावितरण कडून नवीन वर्षात शॉक शेवगाव शहरात व तालुक्यात

## प्रीपेड स्मार्ट मीटर बसवायला सुरुवात

शेवगाव(प्रशांत बाफना)

वीज चोरी वीज गळती आणि आकडे यांना आळा घालण्यासाठी महावितरण च्या शेवगांव शहर आणि ग्रामीण कार्यालयाने घरगुती वापर व्यापारी वापर आणि शेतकऱ्यांसाठी स्मार्ट मीटर बसवण्याची योजना आणली असुन शहरात आणि तालुक्यात अनेक ठिकाणी नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरु झाले आहे शेतकरी व सर्वसामान्यां चे आधीच कंबर मोडलेले त्यातच रिचार्ज संपण्याच्या आत बिल



न भरल्यास अंधारात काढावे लागणार दिवस शेतकरी व सर्वसामान्यां ना महिन्याला किंवा वेळेवर पैसे मिळत नसल्यामुळे महावितरणने स्मार्ट मीटर बसवून गरिबांची शोषण करू नये जुने मीटर व नवीन मीटर याचे सारखे रिडींग पडते का? की नवीन मीटर फास्ट पळतेइ पाहिल्या शिवाय महावितरण नवीन प्रीपेड मीटर बसवू नये जिल्ह्याच्या ठिकाणी स्मार्ट प्रीपेड मीटरची योग्य चाचणी झाल्या शिवाय तालुका व ग्रामीण भागामध्ये मीटर बसवू नये

## चार महिन्यांपासून निराधारांचे थकलेले अनुदान द्या अन्यथा दिव्यांग संघर्ष समिती संघटनेच्या वतीने तहसीलदारांना घेराव : जिलानी शेख

पाटोदा ।प्रतिनिधी

संजय गांधी निराधार योजनेचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे असा आहे, अशा घटकांनी समाजातील इतर घटकांवर अवलंबून न राहता स्वतःला आत्मविश्वासाने जगता यावे म्हणून ही योजना महाराष्ट्र सरकार सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सुरू केलेली आहे, या योजनेअंतर्गत, निराधार व्यक्तींना आर्थिक सहाय्य म्हणून सध्या दरमहा पंधराशे रुपये मानधन दिले जाते परंतु सप्टेंबर – आक्टोंबर २०२४ पासून ते आतापर्यंत पाटोदा तालुका व जिल्ह्यातील काही तालुक्यातील संजय



गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना अद्याप मानधन मिळाले नसल्यामुळे अंध-दिव्यांग, अनाथ मुले, मोठ्या आजाराने ग्रस्त व्यक्ती, वयोवृद्ध, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्ता महिला, अत्याचारी महिला या सर्व लाभार्थ्यांवर सध्या वाढत्या महागाईमुळे उपासमारीची वेळ येवून ठेपली आहे. शासन स्तरावरून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना दरमहा मानधन दिले जाते परंतु संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना गत चार – चार महिन्यांपासून मानधन दिले जात नाही, वर्षभरात बारा महिनेही लाभार्थ्यांकडून दरमहा डिबीटीच्या नावाने कागदपत्रे गोळा करून काहिना काही तांत्रिक अडचणी पुढे करून त्यांची अवहेलना केली जात आहे हि राज्यासह देशाची फार मोठी शोकांतिका असल्याचे म्हणत दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्रचे संस्थापक जीलानी शेख यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्यात यावे अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे तसेच मानधन जमा न झाल्यास पुढील आठवड्यात कुठलीच पुर्वसुचना न देता जिल्हाधिकारी कार्यालय येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना कार्यालयात शेकडो लाभार्थ्यांसह तहसीलदार यांना व संबंधित बीड जिल्हायातील सर्वच तालुक्यातील तहसीलदारांना घेराव घालण्यात येणार असल्याचे आज एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

## पुनमचंदजी लखेरा यांचे निधन

अंबाजोगाई( प्रतिनिधी )

शहरातील जुन्या पिढीतील प्रिंटिंग प्रेस चालक पुनमचंदजी धन्नुलालजी लखेरा यांचे रविवारी पहाटे येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ८४ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता रेणूकाई परिसरातील राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,



एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. येथील दै. पार्श्वभूमीचे वार्ताहर प्रकाश पुनमचंद लखेरा यांचे ते वडील होते. १९६० च्या दशकात अंबाजोगाई शहरात पहिली प्रिंटिंग प्रेस सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. पायडल मारून ट्रेडल सारख्या यंत्रावर अक्षर जुळवून प्रिंटिंग करण्यात लखेरा बंधूचा हातखंडा होता. काळाप्रमाणे या व्यवसायात बदल करीत ऑफसेट प्रिंटिंग व्यवसायातही त्यांनी पदार्पण केले. व्यवसायासह नम्रता, एकमेकांशी नाते जोडणारा त्यांचा हळवा स्वभाव अनेकांना भावत असे. अशा या व्यक्तिमत्त्वाला अंबाजोगाईकर मुकल्याचे दुःख अनेकांनी व्यक्त केले. त्यांच्या निधनाबद्दल शहरातील व्यापारी, माहेश्वरी परिवार यांच्यासह सर्व उपस्थितांनी त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

# शेवगांव भा.ज.प.चे तालुकाध्यक्ष तुषार वैद्य यांचा राजीनामा !

अहिल्यानगर (प्रशांत बाफना)

शेवगांव तालुक्यातील बालमटाकळी येथील भारतीय जनता पार्टीचे विद्यमान तालुका अध्यक्ष तुषार वैद्य यांनी शनिवार दि. १८ रोजी भा.ज.प.चे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांच्याकडे आपला तालुका अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असल्याची माहिती दिली आहे. तुषार वैद्य यांनी दिलेल्या राजीनाम्यात म्हटले आहे की, दि. ६ फेब्रुवारी २०२४ रोजी मला शेवगाव तालुका भा.ज.पा. अध्यक्ष या पदाची जबाबदारी दिली होती. दिलेल्या पदाचा मी पक्ष वाढीसाठी माझ्यापरीने प्रयत्न केला दरम्यानच्या काळात लोकसभेसाठी गावोगाव जाऊन पक्षाचे विकास कार्य व लोक प्रतिनिधींची विकास कामे सांगून लोकांपर्यंत पोहचवण्याच काम केले. परंतु नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकी दरम्यान आमदार मोनिकाताई राजळे व त्यांचे समर्थक यांच्या विचारांच्या मतभेदामुळे मी व आमची कार्यकारिणी प्रचारादरम्यान सहभागी झालो नाही. कारण शेवगाव तालुका भाजपा पक्ष संघटना वाढीसाठी मागील ३० ते ३५ वर्षाचा इतिहास पाहीला तर माझे वडील स्व. शिवनाथ अण्णा वैद्य यांनी त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना बरोबर घेऊन लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे व स्व. दिलीप गांधी यांच्या नेतृत्त्वात शेवगाव तालुक्यात भाजपा पक्ष वाढीसाठी अतिशय कष्ट घेतले. तसेच बालमटाकळी मधील अनेक सहकाऱ्यांच्यामाध्यमातून जुन्या नव्याचा नव्याचा मेळ बसेना तालुक्यात प्रस्थापीतांच्या विरोधात पक्ष संघटना वाढविली हे करत असताना फार मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागला. पाथर्डी– शेवगाव विधानसभा मतदार संघ असताना ज्या वेळेस स्व. दगडू पाटील बडे प्रथम भाजपचे आमदार म्हणून निवडून आले त्या वेळेस शेवगाव तालुका भाजपा संघटना वाढीसाठी त्यांनी देखील स्व.शिवनाथ अण्णा वैद्य मोलाचे सहकार्य केले. तसेच स्व. तुकाराम गडाख व ड. प्रतापराव ढाकणे यांचे देखील सहकार्य लाभले दरम्यानच्या काळात कित्येक नेते पक्षात आले नी परत गेले परंतु स्व. शिवनाथ अण्णा व त्यांच्या सहकार्यांनी पक्ष संघटनेचा विचार सोडला नाही. त्यांचे निधन एप्रिल २००८ मध्ये झाले. नंतर मला पक्षाने २००९ ला युवमोर्चा जिल्हा उपाध्यक्ष व नंतर २०१० ते २०१६ पर्यंत दोन वेळा तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी पक्षाने मला दिली. नंतर मी देखील माझ्या परीने अगदी प्रामाणीकपणे पक्षनीष्टा जोपासून सर्वांना बरोबर घेऊन



पक्ष वाढीसाठी अनेक ठिकाणी शाखा उघडण्यात आल्या नवीन कार्यकर्ते संघटीत केले. २०१४ ला प्रतापराव ढाकणे लोकसभे दरम्यान पक्ष सोडून गेले तरी देखील तालुकस्तरीय मोठे नेतृत्व नसताना मी व माझ्या अनेक सहकऱ्यांनी पक्षाचाच विचार कायम ठेऊन पक्षासाठीच काम करायचे ठरवले. २०१४ विधानसभेसाठी आ. मोनिकाताईना पक्षाने संधी दिली, २०१९ ला दिली आम्ही प्रामाणीक काम केल. परंतु २०१४ ते २०२४ पर्यंत आमदार ताईचे कार्यकर्ते व जुनी भाजपा यांमध्ये पाहीजे तेवढे सौख्य राहीले नाही. आम्ही पटले नाही तरी पक्षाचा उमेदवार म्हणून काम केले परंतु स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जसे की जि. प. पं. स. तसेच ग्रामपंचायत मध्ये राजळे गटाने जुन्या भाजपाला कायम विरोध केल्याचे निदर्शनास आले. तेव्हा या वेळी २०१४ ला विधानसभेच्या पक्षाच्या मुळ कार्यकर्त्याला म्हणजे अरुण भाऊ मुंढे यांना पक्षाने उमेदवारी द्यावी असा आग्रह आम्ही म्हणजे जवळपास ८० % जुन्या

भा. ज.पा. कार्यकर्त्यांनी धरला होता. परंतु त्याला यश आले नाही. पक्षाने मोनिकाताईंना उमेदवारी दिल्याने मागील १० वर्षाचा अनुभव पाहता आम्हाला मिळालेली वागणूक पाहता यावेळी आमच्या विचारांच्या लोकांनी मोनिकाताईचे काम करण्याची मानसीकता राहीली नव्हती. म्हणून मी व आमच्या विचारांच्या लोकांनी शांत बसण्याचा निर्णय घेतला होता. कारण आमदारांच्या कार्यकर्त्यांनी येथून मागे प्रमाणीकपणाने काम करून देखील आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावेळी तर आम्ही उघडपणे पक्षाकडे तिकीट बदलासाठी भूमीका घेतली होती. आम्ही जरी पक्षाचा उमेदवार या नात्याने काम केले असते तरी त्यांनी ते मान्य केले नसते म्हणून शांत बसलो विधानसभेला पक्षासाठी काम केले नाही. शेवगाव तालुक्यात पक्ष वाढीसाठी व निष्ठेसाठी अनेकांचे योगदान आहेच. परंतु वैद्य परिवाराचा सिंहाचा वाटा आहे. हे मी अभीमानाने सांगेल तेव्हा कोणत्या का होईना कारणास्तव मी पदावर असून देखील मी या विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाचे काम न करता शांत बसलो. या गोष्टीची नैतिक जबाबदारी स्वीकारून व तसेच सध्याची राजकीय पद्धती व माझा स्वभाव पाहता मी माझ्या कडील भाजपा तालुका अध्यक्ष या पदाचा राजीनामा देत आहे. तो स्वीकारण्यात यावा. मी पक्षाच्या विचारांचा कार्यकर्ता म्हणून राहणे पसंद करेल. असेही दिलेल्या राजीनामा पत्रात म्हटले आहे.






# सोशल मिडीयावर जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांची खैर नाही

## आक्षेपार्ह पोस्ट केल्याबद्दल केज पोलिस ठाण्यात दोन व्यक्तीवर गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी

सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोष्ट करुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या दोघांवर केज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे बीड जिल्ह्यामध्ये जातीय सलोखा बिघडल्याचे पहावयास मिळत आहे सुनील फड परळी,अमोल शेप लाडेवडगाव यांनी जातीय तेढ निर्माण होईल अशी आक्षेपार्ह पोस्ट केली होती.त्यांच्याविरुद्ध पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी केज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की,दि.१७ जानेवारी २०२५ रोजी सुनील फड, रा.परळी,अमोल शेप रा. लाडेवडगाव



ता.केज यांनी फेसबुक सोशल मीडियावर जातीय तेढ निर्माण होईल अशी पोस्ट फेसबुकवर कमेंट करून प्रसार माध्यमावरप्रसारित केल्याने वरीलदोघांविरुद्ध पोलीस स्टेशन केज येथे गु.र.न.२८/२०२५ कलम १९६,३५३ (२),३५६ (२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तरी सोशल मीडियावर कोणीही जातीय तेढ निर्माण होईल अशी आक्षेपार्ह पोस्ट किंवा कमेंट करू नये किंवा कोणतेही आक्षेपार्ह व्हिडिओ,फोटो प्रसारित करू नयेत असे आवाहन पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी केले आहे. दरम्यान सोशल मिडीया वर आक्षेपार्ह पोष्ट करणाऱ्यांचे धाबेदणाणले आहेत.